फेब्रुवारी
सोमवार
दि.१६
२०२६

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक

# जगमित्र

आजचा अंक ६ पाने
किंमत ३/-

jagmitra2010@gmail.com
www.jagmitra.com

मुख्य संपादक : बालासाहेब कडबाने मो.९४२३९१२५२५ कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.९४२२४०४७४०

बीड • परभणी • लातूर • धाराशिव • जालना • नांदेड • मुंबई • पुणे • छत्रपती संभाजीनगर ... या जिल्ह्यात वितरीत होणारे एकमेव दैनिक

# केज नगरपंचायतीत ३ कोटी ६२ लाखांचा घरकुल महाघोटाळा!

## दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी

### आमदार नमिता मुंदडा आक्रमक उपमुख्यमंत्री आणि नगरविकास सचिवांकडे पत्राद्वारे चौकशीची मागणी!

**निधी कुठे खर्च केला याची नोंद सापडेना, बदलून आलेल्या लेखापालने केला खुलासा**

**निधी इतरत्र खर्च केला असल्याची दिशाभूल**

### "जनतेच्या विश्वासाला तडा!"

*"प्रधानमंत्री आवास योजना ही गोरगरीब जनतेला हक्काचे घर मिळवून देणारी अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना आहे. मात्र, केजमध्ये झालेल्या या भ्रष्टाचारामुळे योजनेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, जनतेचा शासनावरील विश्वासाला तडा गेला आहे. सार्वजनिक निधीचा अपहार कदापि सहन केला जाणार नाही. या प्रकरणाचा शेवटपर्यंत पाठपुरावा करून गोरगरीब लाभार्थ्यांना न्याय मिळवून देणार."*

नमिता मुंदडा (आमदार, केज विधानसभा)

### प्रशासनाच्या भूमिकेकडे तालुक्याचे लक्ष

या भ्रष्टाचार प्रकरणी राज्य शासन आणि जिल्हा प्रशासन नेमकी काय कारवाई करते आणि दोषींना जेलची हवा लागते का, याकडे संपूर्ण केज तालुक्याचे लक्ष लागले आहे. कारण हा घोटाळा सर्वसामान्यांशी निगडित असून, यात शासनाचीही दिशाभूल केल्याचे दिसत आहे. यामध्ये स्वतः आमदार नमिता मुंदडा यांनी लक्ष घातल्याने, यातील सगळे दोषी समोर येतील आणि त्यांना शिक्षा होईल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### आ.नमिता मुंदडा आक्रमक, गुन्हे दाखल करण्याची केली मागणी



आ.नमिता मुंदडा यांनी २ फेब्रुवारी रोजी उपमुख्यमंत्री, नगरविकास सचिव, विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहून या प्रकरणाची विशेष समितीमार्फत चौकशी करण्याची आणि गैरव्यवहार झालेली रक्कम व्याजासह वसूल करण्याची आक्रमक मागणी केली आहे. याशिवाय प्रकरणाची गंभीर दखल घेत केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी राज्य सरकारकडे केली आहे.




केज/बिलाल शेख

केज नगरपंचायतीमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आलेल्या निधीत तब्बल ३ कोटी ६२ लाख रुपयांचा मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे उघड झाले आहे. लेखापाल,वित्त निरीक्षक आणि म्हाडा (MHADA) यांच्या तपासणी अहवालातून हा गंभीर स्वरूपाचा भ्रष्टाचार प्राथमिकदृष्ट्या स्पष्ट झाला आहे. नियमानुसार, प्रधानमंत्री आवास योजनेच्या बीएलसी घटकातील निधी थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होणे अपेक्षित होते.मात्र,केंद्र व राज्य सरकारचा हा निधी नियमांचे उल्लंघन करून इतर अनधिकृत कामांसाठी वळवण्यात आला आहे. याला तत्कालीन मुख्याधिकारी जबाबदार असल्याचे सांगण्यात येत असून, याची खोलात जाऊन चौकशी केली गेली तर अधिकारी आणि सहभागी असलेले कर्मचारी यांचे बिंग फुटणार आहे. केज नगरपंचायतीमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सुमारे ३ कोटी ६२ लाख रुपयांच्या निधीचा अपहार झाल्याचे समोर येत आहे. गरीब आणि घरकुलविहीन कुटुंबांना निवारा देण्याच्या अत्यंत संवेदनशील योजनेतच असा गैरव्यवहार झाल्याची बाब अत्यंत गंभीर असून, प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. ही योजना म्हणजे केवळ आर्थिक मदत नव्हे, तर समाजातील वंचित घटकांना सन्मानाने जगण्याचा अधिकार देण्याचा प्रयत्न आहे. मात्र, ज्या निधीचा उपयोग लाभार्थ्यांच्या घरासाठी व्हायला हवा होता, तो इतरत्र वळवण्यात आल्याचे आरोप आहेत. धक्कादायक बाब म्हणजे हा निधी नेमका कुठे खर्च झाला, याची स्पष्ट नोंदही उपलब्ध नाही. 'एम एन ए' झिरो बॅलन्स खात्यातील निधी नियमानुसार (पान २ वर)

### असद खतीबला स्वच्छता निरीक्षक असताना लेखापाल केले तर सेवानिवृत्त लक्ष्मण जगतापला कॉन्ट्रॅक्ट बेसवर घेतले



नीता अंधारे यांनी या घोटाळ्यामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचे दिसत आहे. त्यांनी स्वच्छता निरीक्षक असलेल्या खतीब याला थेट सहाय्यक लेखापाल केले. लेखापालाच्या संदर्भात या खतीबला काहीच ज्ञान नव्हते. दुसरीकडे लेखापाल म्हणून निवृत्त झालेले लक्ष्मण जगताप यांना कॉन्ट्रॅक्ट बेस वर कामावर घेतले. जगताप सांगतील त्या पद्धतीने कामे करा, असे खतीब याला सांगण्यात आले आणि त्यातून पैशाचा मोठ्या प्रमाणात घोळ घातला गेला. यावरून अत्यंत नियोजन पद्धतीने आणि कोणालाही यात संशय येऊ नये शिवाय हे प्रकरण उघडे पडू नये आणि जर पडले तरी ते व्यवस्थितपणे हाताळता यावे यासाठी या नियुक्त्या अंधारे यांच्याकडून करण्यात आल्या.

### तात्कालिक मुख्याधिकारी मिलिंद सावंत आणि निता अंधारे यांच्या कार्यकाळात घोटाळा

या घोटाळ्याची मोठ्या प्रमाणात व्याप्ती असून, कोट्यावधी रुपये हरवले गेले असल्याची चर्चा आहे. तत्कालीन मुख्याधिकारी मिलिंद सावंत आणि नीता अंधारे यांच्या कार्यकाळात हा घोटाळा झाला असल्याचे सांगण्यात येत असून तसे तारखा वरून स्पष्ट होत आहे. मोठ्या अधिकाऱ्यांचा सहभाग आणि त्यांचे मार्गदर्शन असल्याशिवाय असा मोठा घोटाळा होत नाही यामुळे या अधिकाऱ्यांची सखोल चौकशी केली गेली तर खरी माहिती समोर येईल.

---

महाशिवरात्री निमित्त नगर परिषदेच्या वतीने

## भाविकांना साबुदाणा खिचडी व पाणी बॉटलचे वितरण



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) : बारा ज्योतिर्लिंगापैकी पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या महाशिवरात्री महापर्वा निमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही परळी वैजनाथ नगर परिषदेच्या वतीने येणाऱ्या भाविकांना साबुदाणा खिचडी, शेंगदाणा लाडू व शुद्ध पाणी बॉटलचे वितरण करण्यात आले. बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैजनाथच्या महाशिवरात्री दर्शन पर्व काळासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्त परळी शहरात दाखल होत असतात. या अनुषंगाने महाशिवरात्री महापर्वणी काळात नगर परिषदेच्या वतीने विविध सेवा, सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.त्या अनुषंगाने परळी वैजनाथ नगरपरिषदेच्या वतीने प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनाला येणाऱ्या भाविक भक्तांसाठी महाशिवरात्री निमित्त फराळ अन्नपदार्थांची व्यवस्था दरवर्षी करण्यात येते. यावर्षीही भावीकभक्तांसाठी साबुदाणा खिचडी, शेंगदाणा लाडू व शुद्ध पाणी बॉटल ची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे व आ.धनंजय मुंडे यांनी या स्टॉलला भेट दिली.नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह उपनगराध्यक्ष, सर्व सभापती, परळी नगर परिषदेचे सर्व सदस्य, सदस्या, अधिकारी, कर्मचारी यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## महापशुधन एक्सपो विक्रमी प्रतिसादाने यशस्वी; उत्कृष्ट पशुपालकांना ना.पंकजाताई मुंडेंच्या हस्ते पुरस्कार

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) : माझ्या पशुसंवर्धन विभागाने देश पातळीवरील महा पशुधन एक्सपो अतिशय सुयोग्य पद्धतीने नियोजित करून तो यशस्वी केला आहे. या महा पशुधन एक्सपोमध्ये राज्य व राज्याबाहेरील पशुपालकांनी सहभागी होत आपले नवनवीन प्रयोग, पशुंची वाढ व विकास, आपले अनुभव आणि ज्ञान या ठिकाणी प्रदर्शित केले. यातून अनेकांनी माहिती घेत आत्मविश्वासाने पशुसंवर्धनाच्या क्षेत्रात उतरण्याचा निश्चय केला आहे. पशुपालकांच्या या मेहनत, अनुभव आणि ज्ञानाचा उपयोग विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध



योजना, उपक्रम व उद्योगांमध्ये करून प्रभावीपणे काम करणार असल्याची ग्वाही राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली. एक्सपोच्या माध्यमातून पशूपालकांच्या उन्नतीसाठी काम करता आले याचा सर्वाधिक आनंद होत असल्याच्या भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या. १३ ते १५ फेब्रुवारी यादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या देशपातळीवरील (पान २ वर)



माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांनी आज महाशिवरात्री निमित्त पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथांचे दर्शन घेतले. यावेळी बीड जिल्ह्यातील सामाजिक सौहार्द व जातीय सलोखा अबाधित रहावा, असे साकडे धनंजय मुंडे यांनी प्रभू वैद्यनाथ यांच्या चरणी घातले.

## प्रा.टी.पी.मुंडे यांच्या हस्ते सोमेश्वर महाराजांच्या पालखीस फराळ वाटप!

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) : महाशिवरात्रीच्या पावन पर्वा निमित्त व भक्तिमय वातावरणात सोमेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यात भाविकांसाठी फराळ वाटप कार्यक्रमाचे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी आयोजन करण्यात आले होते. या पवित्र प्रसंगी शिवसेनेचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.टी.पी.मुंडे सर यांच्या हस्ते फराळ वाटप (पान २ वर)





अ.भा.छावा चे बीड जिल्हाध्यक्ष अशोक अण्णा रोमन यांना वाढदिवसानिमित्त शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन पेढा भरवतांना महाराष्ट्र राज्याचे मा.आरोग्यमंत्री आमदार प्रा.डॉ.तानाजीराव सावंत सोबत अ.भा.छावा चे संभाजीनगर जिल्हाध्यक्ष अशोक मोरे पाटील, गोविंद जाधव(सरपंच), मिठ्ठन कोटुळे पाटील, पप्पू लांडे पाटील, दत्ता काशीद, गणेश जाधव, पप्पू शिंदे पाटील, अभिजीत मस्कर बाळासाहेब काशीद, पप्पू मस्के पाटील, अंकुश खडके पाटील, सतीश काळे पाटील, सतीश क्षीरसागर, अविनाश पवार, गजानन पवार संभाजीनगर, बाळू सुर्वे पाटील, गिरीश करवा व इतर छावा मित्रपरिवार.

## महाशिवरात्रीनिमित्त शिवभक्तांना फराळ वाटप; फुलचंद कराड यांचा सेवाभाव

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथ मंदिर येथे महाशिवरात्रीनिमित्त लाखो शिवभक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. 'हर हर महादेव'च्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात संपूर्ण वैद्यनाथ नगरी दुमदुमून गेली होती. या पार्श्वभूमीवर शिवभक्तांची गैरसोय होऊ नये आणि उपवासधारक भाविकांना फराळाची तसेच पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी, या उदात्त हेतूने सोमेश्वर मंदिराच्या पालखी सोहळ्यासही भगवान सेनेचे सरसेनापती तथा शिवसेना शिंदे गटाचे महाराष्ट्र राज्याचे समन्वयक फुलचंद कराड यांच्या वतीने राजगिऱ्याचे लाडू व केळीचे वाटप करण्यात आले. यावेळी सोमेश्वर पालखीचे फुलचंद कराड यांनी मनोभावे दर्शन घेतले. हजारो भाविकांनी या फराळाचा लाभ घेत सेवाकार्यास



कृतज्ञतापूर्वक प्रतिसाद दिला.महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर भक्ती आणि सेवाभाव यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

महाशिवरात्रीसारख्या पवित्र पर्वावर सामाजिक बांधिलकी जपत करण्यात आलेल्या या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. मंदिर परिसरात सकाळपासून रात्री उशिरापर्यंत चाललेल्या (पान २ वर)

## महावितरणचा निष्काळजीपणा की नरबळी?

### गोरे वस्तीत १५ वर्षीय बालकाचा करंट लागून दुर्दैवी अंत!

**बीड (प्रतिनिधी) :** बीड शहरातील बालेपीर भागातील गोरे वस्ती येथे महावितरण आणि संबंधित कंत्राटदाराच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे १५ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ०७:०० वाजण्याच्या सुमारास एका १५ वर्षीय निष्पाप मुलाला आपला जीव गमवावा लागला आहे. शेख आवेज शेख परवेज असे या दुर्दैवी मृत मुलाचे नाव असून, या घटनेने संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, गोरे वस्ती भागात गेल्या काही आठवड्यांपासून नवीन ट्रान्सफॉर्मर (DP) बसवण्याचे काम सुरू होते. महत्त्वाचे म्हणजे, या डीपीला अनेक दिवसांपासून विद्युत कनेक्शन दिलेले नव्हते. मात्र, रविवारी कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता किंवा सुरक्षेची काळजी न घेता अचानक या डीपीमध्ये वीज प्रवाह सोडण्यात आला. डीपी सुरू झाल्याची पुसटशी कल्पनाही नसलेला आवेज खेळता खेळता या डीपीला चिटकला आणि त्याला काळजाचा थरकाप उडवणारा विजेचा धक्का बसला. हा धक्का इतका तीव्र होता की, या १५ वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू झाला.या घटनेनंतर परिसरात प्रचंड तणाव निर्माण झाला असून स्थानिक नागरिकांनी महावितरणच्या कारभारावर (पान २ वर)

### तपास आणि कारवाईची मागणी..

*घटनेनंतर मृतदेह जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी नेण्यात आला आहे. दरम्यान, या घटनेमुळे विजेच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. प्रशासनाने केवळ पंचनामा करून थांबू नये, तर या निष्पाप जीवाच्या मृत्यूला कारणीभूत ठरणाऱ्या 'त्या' बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.*

## पाहिजेत

आमच्या परळी वैजनाथ येथील दुकानासाठी खालील जागा भरणे आहे.

| अ.क्र. | पद | संख्या |
|---|---|---|
| १) | संगणक चालक (कॉम्प्युटर ऑपरेटर) | ०२ जागा |

सूचना : पूर्ण वेळ जॉब (सकाळी ९:३० ते रात्री ८:३०. दुपारी एक तासाची सुट्टी) इंग्लिश येणे आवश्यक आहे.

अकाउंटिंगचे ज्ञान असल्यास प्राधान्य राहील. इच्छुकांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

संपर्क : 9422585858

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक

# जगमित्र

जालना जिल्हा आवृत्ती — दि.१६ फेब्रुवारी २०२६ सोमवार — पान नं.३

महाराष्ट्र शासन नोदंणीकृत **दि.वा.प्रॉपर्टीज** (सेल अ‍ॅन्ड रिसेल मार्केटींग कंपनी)

रेडी पझेशन न्यू फ्लॅट, रिसेल चे फ्लॅट, ओपन प्लॉट, रो हाऊसेस, कमर्शियल जागा, जुनी घरे, बंगलो, शेती, दुकाने इ. खरेदी –विक्री साठी रजिष्ट्री, मोजणीसाठी विश्वासपात्र, वैध प्रॉपर्टी व्यवहारासाठी आपण आमंत्रित आहात.

✻ संपर्क ✻

१) मोढां मार्केट परळी वैजनाथ.
२) तहसील रोड, जिजामाता चौक, अंबाजोगाई.
३) गांधी मार्केट लातूर महानगर, जि.लातूर
४) श्री रेणूका माता मंदीर परिसर, बीड बायपास, छ.संभाजीनगर
५) गुरुद्वारा चौक, अकूर्डी स्टेशन, पुणे महानगर

महाराष्ट्रात कोठेही वैध प्रॉपर्टीचे पारदर्शक व्यवहार विश्वासाने केली जातात.

नियम व अटी लागू

मो.नं.8975457045

## सभागृहासाठी आ.बबनराव लोणीकर यांच्या माध्यमातून १० लक्ष रुपये निधी मंजूर

### संत रोहिदास महाराजांच्या ६४९ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमास भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांची उपस्थिती

**मंठा । प्रतिनिधी**

संत रोहिदास महाराज हे भक्ती चळवळीतील थोर संत होते. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यातून समता, मानवता आणि श्रमप्रतिष्ठेचा आदर्श समाजासमोर ठेवला. जातीभेद, अस्पृश्यता आणि अन्यायाविरुद्ध त्यांनी निर्भीडपणे आवाज उठवून समाजात जागृती निर्माण केली. सर्व मानव समान आहेत हा त्यांचा मूलमंत्र आजही तितकाच प्रासंगिक आहे, रोहिदास महाराजांनी जात, धर्म, गरीब–श्रीमंत असा कोणताही भेद न करता प्रत्येक माणसाला समान सन्मान मिळावा, हा विचार समाजात रुजवला. त्यांच्या या समतेच्या आणि बंधुतेच्या विचारांमुळे समाजात एकोप्याची भावना निर्माण झाली. त्यांनी सांगितले की, आजच्या काळातही समाजात दिसणारे भेदभाव आणि तणाव दूर करण्यासाठी रोहिदास महाराजांचे विचार मार्गदर्शक ठरू शकतात, असे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी स्पष्ट केले.



मंठा येथे संत रोहिदास महाराज यांच्या ६४९ व्या जयंतीनिमित्त आयोजित सोहळ्यात भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर बोलत होते. पुढे बोलताना राहुल लोणीकर म्हणाले की, श्रमाची प्रतिष्ठा हा संत रोहिदास महाराजांच्या जीवनाचा केंद्रबिंदू होता, रोहिदास महाराज स्वतः कष्टकरी होते. त्यांनी कष्टाने मिळवलेल्या अन्नाला आणि श्रमातून उभ्या राहिलेल्या जीवनाला खरे पावित्र्य दिले. युवकांनी कोणत्याही कामाला कमी लेखू नये, कष्टाला सन्मान द्यावा, हा त्यांचा संदेश आजच्या पिढीने अंगीकारणे आवश्यक आहे. असेही राहुल लोणीकर यावेळी म्हणाले.

भक्तीच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवण्याचे मोठे कार्य रोहिदास महाराजांनी केले. देव सर्वांचा आहे, तो कोणत्याही एका जातीचा किंवा वर्गाचा नाही, हा विचार त्यांनी आपल्या अभंगांमधून आणि शिकवणीतून समाजात रुजवला. त्यामुळे समाजात धार्मिक आणि सामाजिक सलोखा निर्माण होण्यास मदत झाली. संत रोहिदास महाराजांचा विचारांमध्ये सामाजिक न्याय, दुर्बलांच्या हक्कांचे संरक्षण आणि मानवतेला सर्वोच्च स्थान होते असेही राहुल लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

आजच्या बदलत्या काळातही रोहिदास महाराजांचे विचार – समता, प्रेम, एकता आणि सामाजिक सौहार्द – समाजाला योग्य दिशा देणारे आहेत. शिक्षण, कष्ट, नैतिकता आणि समाजसेवा या मार्गानेच खरी प्रगती साधता येते. हाच मार्ग संत रोहिदास महाराजांच्या विचारांना खरी मानवंदना ठरेल. विविधतेत एकता हा भारताचा आत्मा रोहिदास महाराजांच्या विचारांतून स्पष्टपणे दिसतो. सर्व समाजघटकांनी एकत्र येऊन देश उभारणीस हातभार लावावा, असे आवाहन राहुल लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले. संत रविदास महाराजांनी दिलेला समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश समाजासाठी सदैव प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचा वारसा जपत समाजहिताचे कार्य करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

तसेच संत रविदास महाराजांच्या मंठा येथील मंदिराच्या सभागृहासाठी माजी मंत्री आमदार बबनरावजी लोणीकर साहेब यांच्या विशेष प्रयत्नातून १० लक्ष रुपये निधी मंजूर करण्यात आला. त्याचे पत्र राहुल लोणीकर यांच्या हस्ते मंदिर समितीकडे सुपूर्त करण्यात आले. तसेच गुरु रविदास महाराजांच्या मंदिराच्या विविध विकास कामांसाठी निधी कमी पडू देणार नाही असेही राहुल लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

या कार्यक्रमाचा कलशारोहण सोहळा महंत बालकगिरी महाराज, माधवराव गायकवाड (प्रदेशाध्यक्ष राष्ट्रीय चर्मकार महासंघ), बाबासाहेब हनवते, सहादू ठोंबरे, नरहरी सोनवणे, मुरली ठोंबरे, राजेश मोरे, महादेव वाघमारे, अंबादास घायाळ, प्रभू शिंदे, विजय अंभोरे, खंडू लहाने, एनडी दवणे, विकास सूर्यवंशी, विलास घोडके, मनोज देशमुख, विक्रम उफाड, पांडुरंग चव्हाळ, वैभव नरवडे, संदीप खंदारे यांच्यासह शहरातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पूर्णा जिल्हा परिषद शाळेच्या स्नेहसंमेलनावर वादाची सावली

### विद्यार्थ्यांऐवजी राजकीय पाहुण्यांना प्राधान्य दिल्याचा आरोप; शिक्षण विभागाच्या भूमिकेकडे लक्ष

**पूर्णा । निशात शेख**




शहरातील डॉ. आंबेडकर नगर येथील जिल्हा परिषद शाळेत दि.१४ रोजी आयोजित स्नेहसंमेलन कार्यक्रमावर राजकीय छाया पडल्याची चर्चा सध्या शहरात रंगली आहे. शाळेच्या माजी विद्यार्थ्यांना डावलून स्थानिक राजकीय व्यक्तींचा सत्कार करण्यात आल्याचा आरोप माजी विद्यार्थ्यांनी केला असून, यामुळे नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. माजी विद्यार्थ्यांच्या मते, स्नेहसंमेलनाचा मुख्य उद्देश विद्यार्थी, शिक्षक आणि माजी विद्यार्थी यांच्यातील स्नेह वृद्धिंगत करणे व विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे हा असतो. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केलेले माजी विद्यार्थी आपल्या अनुभवांद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. मात्र, संबंधित कार्यक्रमात या उद्देशाला दुय्यम स्थान देण्यात आल्याची टीका करण्यात येत आहे.

पूर्णा तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थी नवोदय विद्यालय प्रवेश, शिष्यवृत्ती परीक्षा तसेच तालुका व जिल्हास्तरीय विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळवत आहेत. शिक्षकही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असतात. अशा पार्श्वभूमीवर स्नेहसंमेलनासारख्या शैक्षणिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांपेक्षा राजकीय पाहुण्यांवर अधिक भर दिल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. काही शिक्षक व कर्मचारी स्थानिक राजकीय व्यक्तींना खूश करण्यासाठी कार्यक्रमाचे स्वरूप बदलल्याचेही बोलले जात आहे. तसेच काही शिक्षक बाहेरगावाहून ये–जा करत असल्याने विद्यार्थ्यांकडे अपेक्षित लक्ष दिले जात नसल्याचीही चर्चा शहरात रंगली आहे. दरम्यान, या सर्व आरोपांबाबत संबंधित शाळा प्रशासनाची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नाही. शिक्षण विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन स्नेहसंमेलनाचा मूळ उद्देश अबाधित ठेवावा, अशी मागणी माजी विद्यार्थी व पालकांकडून करण्यात येत आहे. सदर प्रकरणामुळे शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये राजकीय हस्तक्षेपाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## दहिफळ खंदारे येथे श्री सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी

### संत श्री योगनंद महाराज जन्मभूमी मंदिर परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन

**मंठा । प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील दहिफळ खंदारे येथील महान तपस्वी संत श्री योगनंद महाराज यांच्या जन्मभूमी मंदिरावर गोर–बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत श्री सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मंदिर परिसरात प्रतिमा पूजन सोहळा पार पडला. त्यानंतर गावातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. ढोल–ताशांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात शोभायात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भजन–कीर्तन तसेच समाजप्रबोधनपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



गावातील सर्व समाजबांधव, महिला–पुरुष आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी संत श्री सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी वक्त्यांनी संत श्री सेवालाल महाराज यांचे विचार न्यायप्रिय, सौहार्दपूर्ण आणि मानवतेचा संदेश देणारे असल्याचे सांगितले. समाजात एकता, बंधुभाव आणि सद्भावना वाढविण्याचे कार्य त्यांच्या शिकवणीतून आजही सुरू असल्याचे नमूद करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घेतला होता. उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात जयंती सोहळा संपन्न झाला.

## सेलू घरफोडीचा गुन्हा २४ तासांत उघड: आरोपी अटकेत

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी जिल्ह्यातील सेलू शहरात भरदिवसा झालेल्या घरफोडीच्या गंभीर गुन्ह्याची पोलिसांनी अल्पावधीत उकल करत मुख्य आरोपीला जावपास ६ लाख मुद्देमालासह अटक केली आहे. दि.१० फेब्रुवारी रोजी सेलू येथील सह्याद्रीनगर परिसरात अज्ञात इसमांनी एका घराचे कुलूप तोडून कपाटातील रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकूण सुमारे ६ लाख २० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला होता. याप्रकरणी सेलू पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला.



घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह संतोषसिंह परदेशी यांनी विशेष पथके तयार करून तातडीने तपासाच्या सूचना दिल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा परभणी व सेलू पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी पाहणी करून फिर्यादीची सखोल चौकशी केली. तांत्रिक तपास, संशयितांची हालचाल, गुन्ह्याची पद्धत आणि गोपनीय माहितीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तपासाला गती देण्यात आली.

तपासादरम्यान हा गुन्हा रवींद्रसिंग रणजितसिंग टाक (वय २२, रा. मानवत) याने दोन साथीदारांसह केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता गुन्ह्याची कबुली मिळाली. त्याच्याकडून ४ तोळे वजनाच्या दोन सोन्याच्या पाटल्या त्यापैकी एक तुटलेल्या अवस्थेत, सुमारे एक तोळ्याच्या दोन सोन्याच्या अंगठ्या, लहान मुलांच्या कानातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ६ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई अप्पर पोलीस अधीक्षक सुरेश गुजाळ यांच्या नेतृत्वाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील आणि सेलूचे पोलीस निरीक्षक दिपक बोरसे तसेच त्यांच्या पथकाने संयुक्तरीत्या केली. पोलिसांच्या वेगवान व समन्वयित तपासामुळे घरफोडीचा गुन्हा कमी वेळात उघडकीस आला असून उर्वरित साथीदारांचा शोध सुरू आहे. नागरिकांनी संशयास्पद हालचालींबाबत त्वरित पोलिसांना कळवावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात भारतीय समाज सुधारक सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न

**लातूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, जयंती उत्सव समिती आणि आस्थापना विभाग, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त



विद्यमाने भारतीय समाज सुधारक क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांची जयंती महाविद्यालयातील प्राचार्य कक्षात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ. आनंद शेवाळे, पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, प्रो.डॉ. संजय गवई, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे आणि के.आर. कोळी यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम भारतीय समाज सुधारक क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ. आनंद शेवाळे यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांनी सेवालाल महाराज यांच्या जीवनकार्याची माहिती दिली. त्यानंतर प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ. आनंद शेवाळे यांनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी केले तर आभार प्रा. नितीन वाणी यांनी मानले.

## मनात जिद्द व चिकाटी ठेवा यश नक्कीच मिळेल : सौ.डॉ.ठक्करवाड

**कुंडलवाडी । प्रतिनिधी**

आजचा तुमचा शाळेचा शेवटचा दिवस आहे पुढील शिक्षणासाठी दहावीची परीक्षा देणं गरजेच आहे. परंतु मनाशी जिद्द व चिकाटी ठेवा यश नक्कीच मिळेल असे प्रतिपादन दहावीच्या निरोप समारंभ आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्यांनी केले आहे. हुनगंदा येथील सोन्याबाई ठक्करवाड माध्यमिक विद्यालयात दि.१२ फेब्रुबारी रोजी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्ष स्तरावरुन त्यांनी बोलत होते.



यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ.सौ.स्मितताई ठक्करवाड तर प्रमुख मान्यवर म्हणून राजेश्वरराव कनकमवार, मुख्याध्यापक जिंकले बी.बी. यांची उपस्थिती होती. यावेळी सहशिक्षिका एम.डी. सोमवंशी, बी.एस.गुरुडे, एस.डी देगावे, यू. व्ही.भाले, राम गायकवाड, मोहन आकुलवार, नागोराव लोलापोड, संतोष म्याकलवार, रमेश म्याकलोड यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी बहुसंख्य विद्यार्थी व विद्यार्थिनी आप आपले मनोगत व्यक्त केले. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यू.व्ही.भाले यांनी केले तर आभार डी.एस. बोडके यांनी मानले.

## चौथ्या जनहित राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा.डॉ. ललिता शिंदे–बोकारे यांची निवड

**नांदेड । प्रतिनिधी**

राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठाण जवळा ता. लोहा जि. नांदेड च्या वतीने आयोजित चौथ्या राज्यस्तरीय जनहित ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका आणि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या माजी महिला व बालकल्याण सभापती प्रा.डॉ. ललिता शिंदे /बोकारे यांची निवड करण्यात आली असून त्यांच्या या निवडीचे साहित्य क्षेत्रातील मान्यवरांकडून उत्सफुर्त स्वागत करण्यात येत आहे.



ग्रामीण भागातील समाज जीवन साहित्यिक, विचारवंत, लोकप्रतिनिधी, प्रशासकिय अधिकारी, कर्मचारी यांनी प्रत्यक्ष ग्रमीण भागामध्ये येवून बघावे आणि त्यांच्या जीवनामध्ये बदल घडविण्यास सहकार्य करावे, मराठी भाषेचे संवर्धन व्हावे आणि वाचन चळवळ गतिमान व्हावी या उद्देशाने राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठाण जवळा ता. लोहा जि. नांदेड च्या वतीने दरवर्षी ग्रामीण भागामध्ये राज्यस्तरीय जनहित ग्रामीण साहित्य संमेलन आयोजित करण्यात येते. त्यानिमित्त ज्येष्ठ साहित्यिक देविदास फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ग्रामीण कवी प्रा. महेश मोरे यांच्या अध्यक्षतेखाली राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठाण जवळा ता लोहा जि. नांदेड या संस्थेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या चौथ्या राज्यस्तरीय जनहित ग्रामीण साहित्य संमेलन अध्यक्षांच्या निवड समितीची बैठक रविवार ०१ फेब्रुवारी रोजी पार पडली त्यामध्ये ग्रामीण भागाच्या व्यथा, वेदनांची मांडणी करुन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी लेखणी झिजवणाऱ्या तसेच पहिल्यांदा ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा महिला व्हाव्यात या हेतूने नांदेड जिल्ह्यातील मारकंड या गावात जन्मलेल्या ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. ललिता शिंदे /बोकारे यांची सर्वानुमते अध्यक्षपदी निवड करण्यात येवून संस्थेच्यावतीने ज्येष्ठ साहित्यिक देविदास फुलारी, प्रा. महेश मोरे, संयोजक भैय्यासाहेब गोडबोले यांच्या हस्ते त्यांना सन्मानपुर्वक निवड पत्र देण्यात आले. त्यांच्या या निवडीचे जिल्ह्यातील साहित्यिक मंडळींकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या बाजूस मद्यपीचा धुमाकूळ

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून अनेक महिला व मुली ये –जा करत असते पण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या बाजूलाच भर रस्त्यावर नागरिक भर दिवसा दारू पीत आहेत. तेथे ये–जा करणारे ऑटो चालक देखील ऑटो बाजूला लावून या ठिकाणी दारू पीत आहेत. त्यामुळे भर रस्त्याने जाणाऱ्या महिला –मुलींना काही अनुचित प्रकार घडल्यास जबाबदार कोण ?असा प्रश्न नांदेड शहरातील जनतेला पडला आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षक साहेब यांनी तात्काळ लक्ष देऊन या ठिकाणी दारू पिणाऱ्या व्यक्तीवर तात्काळ कारवाई करावी अशी नांदेड शहराच्या जनतेला अपेक्षा आहे पण यावर कारवाई होणार का असाही प्रश्न निर्माण होत आहे.

या ठिकाणाहून ये जा करणाऱ्या महिला व मुलींना देखील मोठा प्रश्न पडला आहे की आपण नांदेड शहरात सुरक्षित आहोत का? दि.१९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पुतळ्याची परिसराची रंगरंगोटी चालू असून महाराष्ट्राचे दैवत मानल्या जाणारे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बाजूला वाईन शॉप असून त्या वाईन शॉप वर दारू घेऊन नागरिक रोडवरच बिनधास्तपणे दारू पीत आहेत मात्र याकडे पोलीस प्रशासन लक्ष देणार का? असा प्रश्न शिवप्रेमींना पडला आहे व वाईन शॉप मालकावर कारवाई होणार का? भर रस्त्यात उभे टाकून दारू किनाऱ्यावर पोलीस प्रशासन कारवाई करणार का? असा प्रश्न शिवप्रेमींना पडत आहे त्यामुळे पोलीस प्रशासनाने तात्काळ याची दखल घ्यावी शिवजन्म उत्सव काळात चार दिवस अगोदर वाईन शॉप तात्काळ बंद करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता विक्रम पाटील बामणीकर यांनी केली आहे.



## डॉ. गजानन टिपराळे यांचा लातूर मॅरेथॉनमध्ये प्रथम क्रमांक; उदगीरचा गौरव

**उदगीर । प्रतिनिधी**

उदगीर येथील माऊली नगरचे रहिवासी डॉ. गजानन टिपराळे यांनी डर्ीी येथे आयोजित १० किमी मॅरेथॉन स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. त्यांनी अवघ्या ५४ मिनिटांत १० किलोमीटरचे अंतर पूर्ण करून प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. त्यांच्या या यशामुळे उदगीर शहराच्या क्रीडा क्षेत्रात मानाची भर पडली आहे. स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार महाराष्ट्राचे दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या पत्नी वैशाली देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला.

डॉ. टिपराळे हे नियमित व्यायाम, सायकलिंग आणि धावण्याचा सराव करतात. सातत्यपूर्ण मेहनत, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी हे यश मिळविल्याचे सांगितले. त्यांच्या या देदीप्यमान यशाबद्दल माऊली नगर परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून युवकांसाठी ते प्रेरणास्थान ठरत आहेत.



✻जालना ✻वर्ष १ ✻अंक १०६ ✻जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, प्लॉट क्रमांक ६६/२, सीटीएस क्र. ९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजी नगर रोड, जालना, महाराष्ट्र – ४३१२०३. येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.✻ पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) ई–मेल–jagmirta2025@gmail.bom

PRGI.No.- MHMAR/25/A2848

*Jalna *Year 01 *Issue 106 *Jagmitra is a newspaper printed by Balasaheb Jijaram Kadbane, Printer, Publisher, Owner, Editor, Jagmitra Offset, Near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli, Va., Taluka, Parli, Va., District, Beed (Maharashtra) and published by Dainik Jagmitra Office, Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Race, Behind Mahindra Showroom, Ch. Sambhaji Nagar Road, Jalna, Maharashtra - 431203. (The editors do not necessarily agree with the content of the daily news.* The responsibility for selecting the content will remain with them as per the PRB Act.) E-mail-jagmitra2025@gamail.com

PRGI.No.- MHMAR/25/A2848

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक

# जगमित्र

शेख मौला शेख उस्मान (नांदेड जिल्हा प्रतिनिधी)
मो.9766664949

नांदेड जिल्हा आवृत्ती — दि.१६ फेब्रुवारी २०२६ सोमवार — पान नं.४




## उस्माननगर येथील संयुक्त पाणीपुरवठा योजना सलाईनवर

### जिवन प्राधिकरण कार्यालयाचे मौन? तर लोकप्रतिनिधी पाणी टंचाईच्या प्रतिक्षेत..

**उस्माननगर । प्रतिनिधी**

कंधार तालुक्यातील सर्वात मोठे गाव म्हणून तर पाणी टंचाईचे गाव म्हणून ओळख असलेल्या मौजे उस्माननगर येथील संयुक्त पाणी पुरवठा योजना मागील वीस वर्षांपासून सलाईनवर असल्याने जिवन प्राधिकरण कार्यालयाने मौन बाळगले, तर तालुक्यातील लोकप्रतिनिधी हे पाणी टंचाईची प्रतिक्षा. पाहत आहेत काय ? असा सवाल जनता विचारीत आहे.



कंधार तालुक्यातील उस्माननगर या गावचे नाव घेतले की, पंचवीस तीस वर्षांपूर्वी असलेली भयंकर परिस्थिती... जानेवारी संपला की नागरिकांना काम धंदे सोडून पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत असे. प्रत्येकाच्या घरा घरात प्लास्टिक पाईम तीस फूट, कॅनी ड्राम, टाक्या आणि मनुष्य बळ ऐवढ ज्यांच्याकडे भांडवल त्यांनाच पाणी मिळत असे. दरवर्षी शासन तात्पुरती योजना म्हणून टॅकर ची व्यवस्था करण्यात येत होती. यामुळे नागरिक दिवसभर त्या टॅंकरची वाट पाहत ताटकळत बसावे लागते. रात्री - अपरात्री टॅंकर आले की.. महीला पुरूष तरूण ज्यांना टॅंकरवर चढता येते ते चढुन प्लास्टिकची नळी टॅंकर मध्ये टाकुन पाणी घेण्याची चढाओढ सुरु होती. तिव्र पाणीटंचाईच्या काळात नागरिकांनी कोसोदूर वरून डोक्यावर घागरी, भांडे भरून आनली. या पाणीटंचाईने उस्माननगर येथील जवळपास सहा ते आठ जणांचा मृत्यू झाला आहे. आडातील पाणी शेदताना महीलेचा तर भर उन्हात पाण्यासाठी घागरीची बारी सरकत असताना नववीत शिकणाऱ्या मुलांचा जागीच बळी गेला. तर चालत्या टॅंकरवर चढताना पाय घसरून टॅंकर खाली सापडून दोघाचा मृत्यू झाला होता.

उस्माननगर येथील भिषण पाणी टंचाई लक्षात घेऊन तत्कालीन आमदार शंकर अण्णा धोंगडे यांनी शिराढोण, भुत्याचीवाडी उस्माननगर संयुक्त पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली. पण आजपर्यंत कायमस्वरूपी पाणी पुरवठा चालू नसल्याने नागरिकांना पाण्यासाठी फिरावे लागत आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाने आता पर्येत गुत्तेदाराना जगवले.... पण पाणी पुरवठा योजनेचे काम काही पुर्ण झाले नाही. संयुक्त पाणी पुरवठा योजना ही चिंचोली येथील पाणी साठवण तलाव येथे पाणीपुरवठा करण्यासाठी टाकी बांधण्यात आली आहे. आता पर्येत कोट्यावधी रुपये खर्च झाले असले तरी उस्माननगर वासीयांची तहाण काही भागली नाही. उस्माननगर येथील तिव्र पाणी टंचाईचे दृश्य संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले आहे. आमिर खान यांनी सत्यमेव जयते.... या कार्यक्रमात दाखवले होते. दरवर्षी उन्हाळा आला की उस्माननगर येथील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असते. मागील अनेक वर्षांपासून उस्माननगर येथील पाणीपुरवठा योजना ही सलाईनवर असल्याने जिवन प्राधिकरण कार्यालयाने मौन बाळगले असे दिसत असून तालुक्यातील लोकप्रतिनिधी पाणी टंचाईची वाट पाहत आहेत काय? असा सवाल जनता विचारीत आहे.

## दीड कोटींच्या कापसी पाझर तलाव दुरूस्ती कामाचे आ. चिखलीकरांच्या हस्ते भूमिपूजन



**उस्माननगर । प्रतिनिधी**

गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या लोहा तालुक्यातील कापसी पाझर तलाव दुरुस्तीच्या कामासाठी दीड कोटी रुपयांचा निधी आ. चिखलीकर यांच्या प्रयत्नातून मंजूर झाला आहे. आ. चिखलीकर यांच्या हस्ते आज प्रत्यक्ष दुरुस्तीच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले आहे. मृद व जलसंधारण विभाग, नांदेड अंतर्गत जिल्हा नियोजन आणि विकास समिती अंतर्गत मौजे कापसी बु. ता.लोहा येथील पाझर तलाव दुरुस्ती करणे एकूण अंदाजित किंमत १ कोटी ५० लक्ष रुपयांच्या या कामाचा भूमिपूजन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी तहसीलदार विठ्ठल जलसंधारणचे परळीकर, उपअभियंता गायकवाड, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती बालाजी पाटील मारतळेकर, जिल्हा परिषद सदस्य गणेशराव पाटील साबळे, सुभाषराव गायकवाड, माजी पंचायत समिती सदस्य गुलाब पाटील उबाळे, केरबा पाटील वडवळे, बाबुराव पाटील वडवळे, राजू पाटील वडवळे, गोविंदराव पाटील चिंचोलीकर, बाळू पाटील ढगे, बळी पाटील, माधवराव कदम, शिवराज पाटील जोमेगावकर, सुमेध गजभारे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## हिंगोली रेल्वे स्थानक परिसरात क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांची प्रतिमा लावणार

### नरहरी झिरवाळ यांची रेल्वे प्रशासनाकडे शिफारस

**कळमनुरी । गंगासागर पंडित**

क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून हिंगोली रेल्वे स्थानक परिसरात त्यांची भव्य प्रतिमा लावण्यात यावी, अशी आग्रही शिफारस राज्याचे नेते व विशेष सहाय्य (अन्न व औषध प्रशासन) विभागामार्फत विभागीय रेल्वे व्यवस्थापकांकडे करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे हिंगोली जिल्हा युवक उपाध्यक्ष संतोष शिवाजी आमले यांनी दि.१० फेब्रुवारी २०२६ रोजी प्रशासनाला एक निवेदन दिले होते.



या निवेदनात त्यांनी नमूद केले होते की, भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या वतीने १५ नोव्हेंबर २०२५ रोजी 'जनजातीय गौरव दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आदिवासी समाजाचे प्रेरणास्थान आणि महान स्वातंत्र्यवीर बिरसा मुंडा यांच्या कार्याची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी आणि प्रवाशांमध्ये राष्ट्रप्रेमाची प्रेरणा निर्माण व्हावी, यासाठी रेल्वे स्थानक परिसरात त्यांची प्रतिमा लावणे आवश्यक आहे.

या निवेदनाची दखल घेत, नरहरी झिरवाळ (विशेष सहाय्य, अन्न व औषध प्रशासन मंत्री महाराष्ट्र राज्य) यांनी दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील विभागीय रेल्वे व्यवस्थापकांना (ऊळच्) पत्र पाठवले आहे. या पत्रात त्यांनी स्पष्ट केले आहे की, रेल्वे प्रशासनाने आपल्या सर्व नियम व अटींचे पालन करून हिंगोली रेल्वे स्थानक परिसरात ही प्रतिमा लावण्यास तातडीने परवानगी द्यावी.बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त रेल्वे स्थानकावर अशा प्रकारे प्रतिमा लावल्यास महान क्रांतिकारकाचा सन्मान होईल, अशी भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे. आता रेल्वे प्रशासन यावर काय तांत्रिक निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## तीर्थक्षेत्र आळणीबुवा मठ देवस्थानकडे जाणाऱ्या रस्त्यावर बोगदा करावा– धनेगाव, मुजामपेठच्या नागरिकांची मागणी

**नांदेड । प्रतिनिधी**

वाजेगाव– लातूर फाटा ते दुध डेअरी चौरस्ता (धनेगाव) विणकर वसाहत इथपर्यंत बोगदा मंजूर करण्यात यावा. या रस्त्यावरून मुजामपेठ आणि धनेगाव येथील नागरिकांना गट ग्रामपंचायतच्या कामासाठी तीन किलोमीटरचा फेरा मारून जावे लागत आहे. एवढेच नाही तर या ठिकाणी तीर्थक्षेत्र असलेले आळणीबुवा मठ देवस्थान आहे. तालुक्यातील धनेगाव/मुजामपेठ गट ग्राम पंचायत कार्यालय यांनी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत पाठपुरावा केला. गावकऱ्यांच्या समस्या दूर करण्यासाठी पाच बोगदे मंजूर करण्यात यावे यासाठी मागील काही वर्षापासून या भागातील नागरिकांनी अनेक वेळा वरिष्ठ पातळीवर पत्रव्यवहारही केला. एवढेच नाही तर नागपूर, दिल्ली येथे केंद्रीय परिवार मंत्री नितीन गडकरी यांची प्रत्यक्ष भेट घेवून निवेदन दिले. धनेगाव/मुजामपेठ येथील कायमस्वरूपी राहणारे नागरिक असून त्यांना बोगदा नसल्यामुळे मुख्य रस्त्यावरून ये– जा करावी लागत आहे. यामुळे कधीही मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही कारण या ठिकाणी शाळकरी मुलं–मुली तसेच ग्रामपंचायत कामासाठी ये–जा करणारी मंडळी आणि आळणीबुवा मठ याच परिसरात असल्याने भक्तांसह नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. या प्रकल्पाचे उपमहाप्रबंधक (तकनीकी) महेश पाटील यांच्यावरही नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. त्यांच्या भूमिकेमुळेच या रस्त्यावर बोगदा होत नसल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे.

वाजेगाव लातूर फाटा ते धनेगाव, दुध डेअरी चौरस्ता आणी विणकर वसाहत धनेगाव राष्ट्रीय महामार्ग ३६१ चे चौपदरी करणाचे काम चालू असून धनेगाव / मुजामपेठ ग्राम पंचायत् कार्यालयाने स्थानिक नागरिकांच्या मागणी नुसार बोगदा करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली. अंत्यविधी, दळवळण, शेतीऔजारे यासाठी थेट वरील मार्गानुसार बोगदा नसेल तर ३ किलोमीटर अंतरात वाढ होईल, अंत्यविधी सारख्या प्रसंगांना अडी अडचणी निर्माण होवू शकतात.

धनेगाव ग्राम पंचायत कार्यालय ते जुने मुजामपेठ स्मशानभूमीकडे जाणारा गावकऱ्यांचा मूळ रस्ता म्हणून बोगदा केल्यास गावकऱ्यांच्या सोयीचे होईल. तीर्थक्षेत्र आळणी बुवा मठ देवस्थानकडे जाणाऱ्या रस्त्यावर बोगदा केल्यास दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांची गैरसोय होणार नाही. नवीन मुजामपेठ (पुर्नवसित गाव) जय हनुमान सोसायटी येथील नागरिकांना ये–जा करण्यासाठी बोगदा केल्यास नागरिकांची गैरसोय होणार नाही. या साठी धनेगाव मुजामपेठ येथील नागरिकांच्या स्वाक्षरीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना दिले आहे.



## प्रशासनाच्या करड्या नजरेत भोकरमध्ये बारावीची परीक्षा सुरळीत

**भोकर । प्रतिनिधी**

तालुक्यात बारावीची परीक्षा प्रशासनाच्या करड्या देखरेखीखाली शांत आणि पारदर्शक वातावरणात सुरू आहे. कॉपीमुक्त आणि निर्भय वातावरणात ३ परीक्षा केंद्रांवर १,२३७ विद्यार्थी परीक्षा देत आहेत. सीसीटीव्ही यंत्रणा, भरारी पथके आणि कडक पोलिस बंदोबस्तामुळे परीक्षा प्रक्रियेला शिस्तबद्ध स्वरूप प्राप्त झाले आहे. डी.बी. कॉलेज, श्री शाहू महाराज कनिष्ठ महाविद्यालय आणि कै.लक्ष्मणराव घिसेवाड ज्युनिअर कॉलेज या तीन केंद्रांवर परीक्षा सुरू आहे. परीक्षा सुरळीत पार पडावी यासाठी ३ केंद्रसंचालक, उपसंचालक आणि ५८ पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**३ केंद्रांवर १,२३७ विद्यार्थी; सीसीटीव्ही, भरारी पथके आणि कडक पोलिस बंदोबस्त**

नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी परीक्षेदरम्यान कोणतेही गैरप्रकार होऊ नयेत, यासाठी तालुका दक्षता समितीला कठोर उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत. संवेदनशील केंद्रांवर सीसीटीव्ही द्वारे सतत देखरेख ठेवण्यात येत असून बैठे पथके कार्यरत आहेत. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना सर्व केंद्रप्रमुखांना देण्यात आल्या आहेत. उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार विनोद गुंडमवार, नायब तहसीलदार डांगे, गटशिक्षणाधिकारी किशन फोले, शिक्षण विस्तार अधिकारी सुमन गोणारकर आदी अधिकारी व सदस्य केंद्रांना अचानक भेटी देत आहेत. पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या सर्व उपाययोजनांमुळे परीक्षा प्रक्रिया पारदर्शक आणि कॉपी मुक्त वातावरणात पार पडत असल्याचे चित्र आहे. कॉपीमुक्त वातावरणामुळे पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

## निवृत्त मुख्याध्यापक व्यंकटेश कुलकर्णी यांची पत्रकारांच्या प्रतिबिंबला देणगी

**नांदेड । प्रतिनिधी**

राज्याचे उच्च तंत्र शिक्षण व संसदीय कार्य मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या प्रेरणा व आश्रयाने पत्रकारांच्या मुला – मुलींच्या करिअरसाठी स्थापन झालेल्या प्रतिबिंब प्रतिष्ठानला निवृत्त मुख्याध्यापक व्यंकटेश कुलकर्णी यांनी दहा हजार रुपयांचा निधी दिला.



सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील ठोंगे उपळाई जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे निवृत्त मुख्याध्यापक व्यंकटेश यांनी प्रतिबिंब प्रतिष्ठानला दहा हजार रुपयांची देणगी दिली. अ. भा. नाट्य परिषदेच्या बार्शी शाखेचे अध्यक्ष कवी सोमेश्वर घाणेगावकर, ज्येष्ठ पत्रकार सचिन अपसिंगकर व अनिल जोशी यांच्या उपस्थितीत बार्शी येथे पार पडलेल्या छोटेखानी कार्यक्रमात व्यंकटेश कुलकर्णी यांनी डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्र व प्रतिबिंब प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजा माने व प्रतिबिंब प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष दिपक नलावडे यांना देणगीचा धनादेश सुपूर्द केला. कुलकर्णी यांनी ना. चंद्रकांतदादा यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या पत्रकारांच्या कुटुंबासाठी चाललेल्या कार्याने प्रभावित होवून देणगी दिल्याचे सांगितले. त्यांच्या उत्स्फूर्त देणगी बद्दल दिपक नलावडे यांनी आभार मानले. प्रतिष्ठानच्या वतीने आता पर्यंत पत्रकारांच्या मुला मुलींच्या शिक्षण व करिअरसाठी चंद्रकांतदादा शिष्यवृत्ती तसेच वैद्यकीय सेवेसाठी सुमारे सोळा लाख रुपयांची मदत करण्यात आली आहे.

## भोकर शहरासह परिसरात मोठा अवैध वाळूसाठा

### वाळू जप्त करून घरकुल लाभार्थ्यांना वाटप करण्याची मागणी

**भोकर । एजास कुरेशी**

गौण खणिज नियंत्रण पथकाची नेमणूक करणे, भोकर शहर व परिसरातील विविध ठिकाणचे अवैध वाळू साठे जप्त करुण घरकूल लाभार्थ्यांना वाळू वाटप करण्यात यावी,वाळू तस्करांवर कारवाई करणेसह विविध मागणीसाठी पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते सुभाष भालेराव यांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन दिले त्या अनुषंगाने १५ फेब्रुवारी २०२६ पासून आमरण उपोषण करणार आहेत. भोकर शहरात व परिसरात मागिल अनेक महिन्यांपासून वाळू तस्करांकडून उमरी, मुदखेड मुदखेड मार्गे विना नंबर प्लेट गाड्यांचा वापर करून वाळूचे अवैध साठे साठवणूक करून ठेवत आहेत.

वाळू तस्करांकडून केलेले अवैध वाळू साठ्यांचे पंचनामे करून जप्त करण्यात यावे, जप्त केलेल्या वाळू साठ्यांचा लिलाव करण्यात यावे, जेणेकरून प्रशासनाकडे महसूल जमा होईल किंवा जप्त केलेल्या वाळू साठ्यातून शहर व तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना वाळू वाटप करण्यात यावे, भोकर शहर व तालुक्यात होत असलेली अवैध वाळू वाहतूक व अवैध उत्खननावर नियंत्रण आणण्यासाठी व बुडणार महसुल वाचवण्यासाठी गौण खणिज नियंत्रण पथकाची कायस्वरुपी नेमणूक करण्यात यावी, मागील एक वर्षापासून आजपर्यंत भोकर शहर व तालुक्यात किती अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या गाड्यांवर व अवैध उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली याची सविस्तर माहिती देण्यात यावी, आजपर्यंत भोकर शहर व तालुक्यातील किती लाभार्थ्यांना शासनाकडील वाळू वाटप करण्यात आले त्यांची यादी देण्यात यावी आदी मागण्याचे निवेदन उपविभागीय अधिकारी भोकर यांना सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार सुभाष भालेराव यांनी दिनांक ४ फेब्रुवारी रोजी दिले. निवेदनात १४ फेब्रुवारी पर्यंत निवेदनाच्या अनुषंगाने कारवाई करण्याची मागणी केली होती. अन्यथा कारवाई न झाल्यास १५ फेब्रुवारी २०२६ रोजी आमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला होता.

सदरील निवेदनाच्या अनुषंगाने कारवाई करण्यासाठी दहा दिवस अवधी असताना दिनांक १४ फेब्रुवारी पर्यंत कारवाई करणे अपेक्षित होते.परंतु कारवाई करणेसाठी एक दिवस उरले असताना प्रशासनाकडून कुठलीही दखल घेतली गेली नसल्याने निवेदनकर्ते १५ फेब्रुवारी २०२६ पासून उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार आहेत. या उपोषणामुळे वाळू तस्करांचे धाबे दणाणले जाणार असुन निवेदनकर्त्यांच्या मागण्या प्रशासनाकडून मान्य होतील का..? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

## केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालयात पुलवामा हल्ल्याच्या शहीदांना श्रद्धांजली

**मुदखेड । प्रतिनिधी**

शहरातील केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालयात आज दि.१४ फेब्रुवारी २०२६ रोजी पुलवामा दहशतवादी हल्ल्याच्या वर्धापन दिनानिमित्त शहीदांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी केंद्रीय राखीव पोलीस दलात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमादरम्यान आयएएस, महानिरीक्षक तथा संस्थेचे प्राचार्य आर. गोपाल कृष्ण राव यांनी हुतात्मा स्मारकावर पुष्पहार अर्पण करून शूर सैनिकांना आदरांजली वाहिली. Ri'pkr शहीद जवानांना विशेष गार्डतर्फे औपचारिक सलामी देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थित अधिकारी, अधिनस्त अधिकारी व सैनिकांनीही हुतात्मा स्मारकावर पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

पुलवामा येथे झालेल्या या भीषण दहशतवादी हल्ल्यात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या ४० शूर जवानांनी देशाचे रक्षण करताना सर्वोच्च बलिदान दिले. त्यांच्या अदम्य धैर्याला, कर्तव्याप्रती निष्ठा आणि मातृभूमीप्रती अटळ समर्पणाला देश नम्रपणे सलाम करतो. शहीदांचे हे बलिदान देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षेप्रती आपली बांधिलकी आणखी मजबूत करते आणि प्रेरणा देते. श्रद्धांजली सभेत संस्थेचे कमांडंट व्ही.पी. त्रिपाठी व इतर अधिकारी, कर्मचारी व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून शहीद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

## काँग्रेसला बदनाम करण्याचा कुटील डाव : खा. रवींद्र चव्हाण

**मुदखेड । अतीक अहेमद**

काँग्रेस पक्षाची विचारधारा सर्व जाती धर्माला घेऊन चालणारी असल्याने जनतेमध्ये संभ्रम निर्माण करून पक्षप्रवेशाच्या वल्गना करणे म्हणजे पक्षाला बदनाम करण्याचा कुटील डाव असून पक्ष संघटन मजबुतीसाठी कार्यकर्त्यांनी वज्रमुठ बांधली असून राजकारणात काहीही होऊ शकते तेच नेते भविष्यात काँग्रेस पक्षात येऊ शकतात अशी गुगली टाकत भाजप पक्षप्रवेशाला पूर्णविराम दिला आहे.

मुदखेड तालुका काँग्रेस जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन ता. १४ (शनिवार) खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले आहे. माजी नगराध्यक्ष राजबहादुर कोतावर अध्यक्षस्थानी होते. काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष प्राध्यापक यशपाल भिंगे, जिल्हा कार्याध्यक्ष पप्पू पाटील कोंडेकर, किसान सेलचे जिल्हाध्यक्ष माधव पवळे, तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, उबाठा सेनेचे तालुकाप्रमुख पिंटू पाटील वासरीकर, जिल्हा उपाध्यक्ष दादाराव पुयड, जिल्हा सचिव सूर्यकांत चौदंते, नांदेड जिल्हा सहसचिव गिरीश कोत्तावार, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत पाटील, शहराध्यक्ष मुजीब पठाण, गंगाधर डांगे, नवनिर्वाचित नगरसेवक अविनाश चौदंते, संजय बोकेफोड, कदीर भाई, माजी उपनगराध्यक्ष करीम साब, माजी नगरसेवक गोविंद गोपनपल्ले, शहर सचिव अतीख अहेमद यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांनी तालुक्यात प्रत्येक गावागावात काँग्रेसची विचारधारा पोहोचून संघटन मजबुतीसाठी वज्रमुठ बांधण्याचा निर्धार केला आहे.

यावेळी बोलताना खा.रवींद्र चव्हाण म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून भाजपचे नेते काँग्रेस पक्षाची बदनामी करण्याचा धंदा सुरू केला आहे. काँग्रेसचे मजबुतीकरण आता पक्षात राहून मोठमोठे पदे उपभोगणाऱ्या नेत्याच्या मतदारसंघा पासूनच सुरुवात करण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी कंबर कसली आहे. प्रा.यशपाल भिंगे यांनी सध्या केंद्रातील व राज्यातील सरकार सर्वसामान्य जनतेचे शोषण करीत असून हिंदुत्वाच्या नावावर जातीजातीत भांडणे लावून दिशाभूल करीत असल्याचे सडकून टीका मोदी सरकारवर केली. यावेळी पप्पू पाटील कोंडेकर यांनी भविष्यात काँग्रेसला चांगले दिवस येणार असून भाजपाच्या फोडाफोडीच्या राजकारणाच्या प्रलोभनाला बळी न पडता काँग्रेसने आता निष्ठावंताच्या साह्याने आपला पक्ष बळकट करण्याचा निर्धार केला आहे.

यावेळी राजेश पवार निवघेकर, रमेश बोडके, भिमराव महादवाड, मोईन फुलारी, गौस मुल्ला, भगवान पवार, राजेश पवार, प्रशांत मुंगल, तेजाबराव मुंगल, सुभाष चौदंते, करीम खासाब उपाध्यक्ष, बालाजी सुर्यवंशी, रशीद मुल्तानी, खलील खुरेशी, पाशा नासर, हबीब भाई, फेरोज भाई, शिवानंद देवके, सुरेश ढगे, दादाराव नागेलीकर, विनोद चव्हाण, विठ्ठल आचार्य, अविनाश चमकुरे, शिवाजीराव एडके, सुरेश जंगीलवाड, प्रकाश शेटेविश्वनाथ पवार, महेश देशमुख, भगवान पवार, बळवंत पाटील पुयड, शिवाजी वडजे, नागोराव भांगे, सुनील निखाते, माधव अक्कमवाड, मुलतानी, माणिकराव मुंगल, कुलदीप मल्लेवार, वेदांत शेवटे, तेजस जाधव, संभाजी गाडे, सुरेश गोवंदे, गणेश सूर्यतळे, महेश पवार, नंदु पवार यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

*नांदेड *वर्ष १ *अंक १७ *जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, ९-२-३४६, बिलाल नगर,देगलूर नाका, इतवारा, नांदेड महाराष्ट्र - ४३१६०४. येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) ई-मेल-jagmirta2010@gmail.bom
PRGI.No.- MHMAR/26/A0270

*Nanded, *Year 1, *Issue 17 *Jagmitra newspaper is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, 9-2-346, Bilal Nagar, Deglur Naka, Itwara, Nanded, Maharashtra - 431604. (The editor may not necessarily agree with the content and news published in the daily. *The responsibility for selecting the content rests with them as per the PRB Act.) Email: jagmitra2010@gmail.com
PRGI.No.- MHMAR/26/A0270

cmyk

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक

# जगमित्र

संगिता काळे (धाराशिव जिल्हा प्रतिनिधी) मो.9588601740

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी) मो.9673158719

धाराशिव जिल्हा आवृत्ती/लातूर — दि.१६ फेब्रुवारी २०२६ सोमवार — पान नं.५

**आता संभाजी नगर, पुणे, मुंबई येथे जाण्याची गरज नाही**

मुळव्याध : संडासच्या जागी आग होणे, दुखणे, कोंब येणे, रक्त जाणे, जागा लहान होणे, फिशर

सांधेदुखी : पाठीच्या मणक्याचे त्रास, चमक मारणे, गॅप पडणे, गुडघे दुखी, टाचदुखी, मानपाठ, कंबरदुखी, हातपायाला मुंग्या येणे, नस दबणे, डोकेदुखी, अंग दुखणे,

स्त्रीयांचे सर्व आजार : मुल बाळ होत नसल्यास वजन जास्त असणे, केस गळणे, चक्करयेणे, घबराहट, बैचेनी, झोप न येणे, पचनाचे व पित्ताचे त्रास, पोटदुखी, हाडीताप, मुतखडा, त्वचारोग, ॲलर्जि सर्दी, खोकला, दमा.

रविवारी दवाखाना बंद राहील

डॉ.रविंद्र ईटके
आयुर्वेद व पंचवर्ग तज्ञ (पुणे)

डॉ.सौ.भाग्यश्री ईटके
स्त्रीरोग व आयुर्वेद तज्ञ

वेळ : स. ११ ते २.३० संध्या : ६ ते ८
सोनोग्राफी सेंटर समोर पदमावती गल्ली, परळी. वै
मो.9822816010, 7588596838

**विश्वश्री : आयुर्वेद हॉस्पिटल व पंचकर्म केंद्र**

## धाराशिव हादरलं! मित्रांच्याच हातून तरुणाचा थरारक अंत

# कलाकेंद्रातील बारगीतून रक्तरंजित शेवट!

**धाराशिव । संगीता काळे**

जिल्ह्यातील महाकाली कला केंद्रावर घडलेल्या एका धक्कादायक घटनेने संपूर्ण जिल्हा स्तब्ध झाला आहे. नर्तिकेचा डान्स पाहण्यासाठी गेलेल्या ३७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. पण या प्रकरणाला अधिक भयानक वळण तेव्हा मिळाले, जेव्हा मृत तरुणाच्या कुटुंबियांनी थेट त्याच्याच मित्रांवर खुनाचा गंभीर आरोप केला. मृत तरुण सतीश मुंडे (रा. साळेगाव, ता. केज, जि. बीड) हा आपल्या काही मित्रांसोबत धाराशिवमधील महाकाली कला केंद्रावर गेला होता. बारमधील नृत्याचा आनंद घेत असतानाच जुन्या वादाचा ठिणगीने अचानक भडक घेतल्याचा आरोप आहे. मित्रांनीच दारू पाजून, जुन्या भांडणाचा राग मनात ठेवून निर्दयीपणे मारहाण केली, असा थेट आरोप सतीशच्या वडिलांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीत केला आहे.

तक्रारीनुसार, आरोपींनी सतीशच्या छातीवर आणि पोटावर जबर मारहाण केली. या मारहाणीत तो गंभीर जखमी झाला आणि त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला असून तपासाची चक्रे वेगाने फिरू लागली आहेत.




**कलाकेंद्रांभोवती वाढते गुन्हे – प्रशासन झोपेत?**

गेल्या काही दिवसांत धाराशिव, बीड आणि सोलापूर जिल्ह्यातील कला केंद्रांभोवती गुन्हेगारी वाढल्याचे चित्र समोर येत आहे. काही दिवसांपूर्वीच बारशी येथे प्रेमप्रकरणातून एका माजी उपसरपंचाने आत्महत्या केल्याची घटना ताजी असताना, आता पुन्हा एकदा कलाकेंद्रातच मृत्यू झाल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, कलाकेंद्र की गुन्हेगारी अड्डा? असा सवाल आता सर्वसामान्यांकडून उपस्थित केला जात आहे. रात्री उशिरापर्यंत सुरू राहणारे कार्यक्रम, मद्यधुंद तरुण आणि जुन्या वैरातून उफाळणारे वाद – या साऱ्यामुळे वातावरण चिघळत असल्याचे बोलले जात आहे.

**मित्रच ठरले शत्रू!**

विश्वासाच्या नात्याला तडा देणारी ही घटना समाजासाठी धोक्याची घंटा ठरत आहे. एकत्र मौजमजा करायला गेलेले मित्र काही क्षणांतच एकमेकांचे जीव घेणारे शत्रू बनतात, ही वस्तुस्थिती अस्वस्थ करणारी आहे. या घटनेमुळे प्रशासनाने कला केंद्रांवरील नियंत्रण अधिक कडक करावे, सीसीटीव्ही तपासणी आणि रात्रीच्या गस्तीत वाढ करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. धाराशिव हादरवणाऱ्या या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, सत्य बाहेर येईपर्यंत नागरिकांच्या नजरा पोलिसांच्या कारवाईकडे लागल्या आहेत.

मित्रांच्या संगतीत सुरू झालेली रात्र, मृत्यूच्या सावलीत संपली धाराशिवच्या या घटनेने अनेक प्रश्न अनुत्तरित ठेवले आहेत!

## पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाची नांदेड मधील अवैध रेतीविरुध्द कारवाई

### १ कोटी रुपयांची साधनसामुग्री व वाळू जप्त

**लातूर । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी आपल्या कार्यालयातील अधिकारी व अंमलदारांचे पथक मौजे ब्राम्हणवाडा येथे पाठविले होते. सदर पथकाने, दिनांक १४.०२.२०२६ रोजी सायंकाळी १८.०० वा. दरम्यान पोलीस ठाणे विमानतळ हद्दीतील मौजे मुगट व ब्राम्हणवाडा शिवारातील हिराघाट जवळील धक्क्यावर कारवाई करत दोन ढरींर कंपनीचे टिपर, एक गउइ मशीन यासह, नदीपात्रातून बाहेर काढून ठेवलेली (४०) ब्रास वाळू, असा एकूण ६१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात पोलीस ठाणे विमानतळ येथे गुरनं ३६/२०२६ कलम ३०३(२), ३(५), ४८(७) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस ठाणे विमानतळ येथील पोहेकॉ/ संतोष राणे हे करीत आहेत.



सदर कारवाईनंतर पथकाने, पोलीस ठाणे मुदखेड हद्दीत मुगट शिवारातील वाळू धक्क्यावर कारवाई करत एक ढरींर कंपनीचे टिपर, एक गउइ मशीन यासह, नदीपात्रातून बाहेर काढून ठेवलेली (३०) ब्रास वाळू, असा एकूण ४६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात पोलीस ठाणे मुदखेड येथे गुरनं २५/२०२६ कलम ३०३(२), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस ठाणे मुदखेड येथील पोहेकॉ/अंगद कदम हे करीत आहेत.

सदर कारवाईवरून, पोलीस ठाणे विमानतळ व मुदखेड हद्दीतील मौजे ब्राम्हणवाडा व मुगट येथील घाटावरुन मोठया प्रमाणावर अवैधरित्या वाळू उपसा, साठवणूक व वाहतूक होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. उपरोक्तप्रमाणे दोन्ही कारवायांत विशेष पथकाने, ३४ लाख रुपये किमतीचे टाटा कंपनीचे (३) टिप्पर, ७० लाख किमतीच्या (२) गउइ मशीन यांचेसह, ३ लाख ५० हजार रुपये किंमतीची (७०) ब्रास वाळू असा एकूण १ कोटी, ७ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन (६) आरोपीतांना ताब्यात घेतले आहे.

सदर कारवाईत सपोनि श्री श्रीराम माचेवाड यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/संजीव जिंकलवाड, पोकॉ/ गणेश धुमाळ व पोकॉ/ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांना प्रशंसापत्र देऊन त्यांचे अभिनंदन केले आहे.

## महाशिवरात्री निमित्त महावितरण कर्मचाऱ्यांचा प्रसाद वाटप व जनजागृतीचा स्तुत्य उपक्रम

**पुणे । धनंजय माने**

महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त जनता वसाहत परिसरातील आनंद मठ तसेच श्री चंद्रेश्वर मंदिर येथे भक्तिमय वातावरणात सामाजिक जाणीवेचा प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. धार्मिक श्रद्धेसोबत सामाजिक कर्तव्याची जोड देणारा हा कार्यक्रम विशेष ठरला. या प्रसंगी (महावितरण) चे कर्मचारी महादेव चांगिरे, नागेश ईगे, राजू चेडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी उपस्थित भाविकांना प्रसाद वाटप करून सेवाभाव व्यक्त केला. याच वेळी नागरिकांमध्ये वीज देयक वेळेत भरण्याबाबत, स्मार्ट मीटर बदल प्रक्रिया तसेच वेळेनुसार वीजदर पद्धतीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

नियोजित तारखेपूर्वी वीज देयक भरल्यास विलंब अधिभार व वीजपुरवठा खंडित होण्याची शक्यता टाळता येते, अशी माहिती देण्यात आली. नियमित व वेळेत देयक भरणे ही प्रत्येक ग्राहकाची जबाबदारी असून त्यामुळे अखंडित व सुरळीत वीजसेवा राखण्यास मदत होते, असे स्पष्ट करण्यात आले. अधिकृत संकेतस्थळे व अधिकृत देयक भरणा केंद्रांद्वारे सुरक्षित पद्धतीने देयक भरण्याचे आवाहन करण्यात आले.



स्मार्ट मीटरमुळे अचूक व पारदर्शक बिलनिर्धारण, तात्काळ वीज वापराची माहिती आणि ऊर्जा व्यवस्थापन सुलभ होते, याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. तसेच वेळेनुसार वीजदर पद्धतीअंतर्गत विविध वेळांनुसार वेगवेगळे दर लागू होत असल्याने नियोजनपूर्वक वीज वापर करून बचत साधता येऊ शकते, अशी माहिती देण्यात आली. या संदर्भातील माहितीपत्रके उपस्थित भाविकांना वितरित करण्यात आली व नागरिकांच्या शंकांचे समाधान करण्यात आले. श्रद्धा आणि सामाजिक जबाबदारी यांचा संगम घडविणारा हा उपक्रम नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे अधिक प्रभावी ठरला.

## पाचव्या विशाल बौद्ध धम्म परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : भदंत धम्मसार थेरो

**वागदरी । किशोर धुमाळ**

किल्लारी तालुका औसा जिल्हा लातूर येथे तक्षशिला बुद्ध विहार तथागत बुद्ध गार्डन ग्रामीण रुग्णालयाच्या पाठीमागे गुरुवार दिनांक २६ फेब्रुवारी २२६ रोजी सकाळी ठिक १ वा. ते सायंकाळी ठिक ६ वा. दरम्यान पाचव्या विशाल बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले असून या बौद्ध धम्म परिषदेस लातूर व धाराशिव जिल्ह्यातील तमाम श्रध्दासंपन्न बौद्ध उपासक उपासिका यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन या धम्म परिषदेचे मुख्य आयोजक पूज्य भदंत धम्मसार थेरो यांनी केले आहे.

बौद्ध धर्म हा मानवतेची शिकवण देणारा असून या धम्मात कर्माला फार महत्व आहे. बौद्ध धम्माचा विचार हा मानवतेचा विचार आहे. हा मानवतेच्या समतेच्या विचारांचा प्रसार व्हावा आणि संबंध मानव जातीकडून बौद्ध धर्माच्या विचारांचे आचरण व्हावे या उद्देशाने बौद्ध धम्माच्या विचाराचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी किल्लारी येथील तक्षशिला बुद्ध विहाराच्या प्रांगणामध्ये दरवर्षी विशाल बौध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात येते.



याही वर्षी गुरवार दिनांक २६ फेब्रुवारी २२६ रोजी धम्मगुरु पूज्य भदंत डॉ.उपगुप्त महाथेरो कार्याध्यक्ष अखिल भारतीय भिकू संघ बुद्ध गया यांच्या अध्यक्षतेखाली तर देशाचे सामाजिक न्याय व अधिकारता राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष नामदार रामदास आठवले व औसा विधानसभा मतदार संघाचे आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पाचव्या विशाल बौद्ध धर्म परिषदेचे आयोजन करण्यात आले असून या धम्म परिषदेस लातूर आणि धाराशिव जिल्ह्यातील श्रद्धासंपन्न बौद्ध उपासक उपासिकेने व बौद्ध बांधवांनी, आंबेडकरी अनुयायांनी तक्षशिला बुद्ध विहार तथागत बुद्ध गार्डन ग्रामीण रुग्णालयाच्या पाठीमागे किल्लारी या ठिकाणी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन पूज्य भदंत धम्मसार थेरो यांनी नळदुर्ग येथे या धम्म परिषदेच्या प्रसार आणि प्रचारादरम्यान दौऱ्यावरआले असता उपसकाशी बोलताना केले.




## लातूरमध्ये न्यायासाठी समाजाचा सोमवारी आक्रोश महामोर्चा

**अनुष्का पाटोळे हत्या प्रकरणी कठोर कारवाईची मागणी**

**लातूर । प्रतिनिधी**

शहरातील नवोदय विद्यालयातील विद्यार्थिनी अनुष्का पाटोळेच्या हत्या प्रकरणात न्याय मिळावा, या मागणीसाठी समाजाचा भव्य आक्रोश महामोर्चा आयोजित करण्यात येत आहे. या संदर्भात सकल मातंग समाजाच्या वतीने पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत माहिती देण्यात आली. सोमवार, दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता हा महामोर्चा काढण्यात येणार असून समाजातील बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

हा मोर्चा साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे पूर्णाकृती पुतळा परिसर येथून सुरू होऊन जिल्हा परिषद कार्यालय, शिवाजी महाराज चौक ते जुने जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे समाप्त होणार आहे. या मोर्चात माजी गृहमंत्री तथा मंत्री महाराष्ट्र राज्य रमेश बागवे, लहुजी शक्ती सेना प्रदेशाध्यक्ष विष्णू कसबे, माजी आमदार सुधाकर भालेराव, राम गुंडिले, डिपीआयचे अंजिक्य चादणे, नागिनीताई कांबळे, रामचंद्र भराडे, सचिन साठे, मच्छिंद्र सकटे, राजाभाऊ जयवंत आवळे, दीपक केदार, महेश डोलारे आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

या मोर्च्याद्वारे पुढील प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत : माजी न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली निष्पक्ष चौकशी समिती स्थापन करावी, सदर प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून तात्काळ न्याय मिळवून द्यावा, हे प्रकरण आत्महत्या नसून खुनाचे असल्याने सर्व आरोपींवर कठोर कारवाईच्या दृष्टीने तपास करावा, नवोदय विद्यालय आस्थापनेचे अध्यक्ष व प्रमुख पदाधिकाऱ्यांना सहआरोपी करण्यात यावे व आरोपींची नार्को टेस्ट करावी. अध्यक्षांच्या मोबाईलचा सीडीआर तपासावा तसेच सर्व आरोपींचे तत्कालीन लोकेशन तपासात घ्यावे, एसआयटीच्या प्रमुख तपास अधिकाऱ्यांच्या तपासाबाबत शंका असल्याने तात्काळ अधिकारी बदलावा, मृत मुलीच्या आई–वडिलांचा पुरवणी जबाब घेऊन तपास अहवालात आरोपींची संख्या व नावे निश्चित करून एफआयआरमध्ये आवश्यक बदल करावेत, अनुसूचित जाती–जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करावी, सदर प्रकरणातील सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी. या मागण्यांसाठी समाज एकत्र येत असून, न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच ठेवला जाईल, असा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## भादा ते शिवली रस्त्यावरील पूलाचे काम प्रगतीपथावर; शेतकरी विकासासाठी महत्वाचा मार्ग!



**औसा । बी.डी. उबाळे**

तालुक्यातील भादा ते शिवली रस्त्यावर सुरू असलेल्या पूलाचे काम सध्या प्रगती पथावर असून यामुळे भादा व परिसरातील पोलीस प्रशासन, आरोग्य सेवा, शेतकऱ्यांची शेती उत्पादन वाढण्यास मदत होणार आहे. हा भादा ते शिवली रस्ता गेल्या अनेक वर्षापासून रस्त्याचे काम होण्याचे आपेक्षीत होते परंतु या भागाकडे शेतकरी, स्थानिक पुढारी ते प्रशासनातील अधिकारी यांनी लक्ष न दिल्याने त्या रस्त्याचा विकास होण्याचा पर्याय बंद होता परंतु काही वर्षांपूर्वी या भागातील नागरिकांनी शेतकऱ्यांनी आणि ग्रामपंचायत सदस्य यांनी भादा ते लातूर पायी चालत जाऊन या भागातील भादा ते शिवली, भादा शिंदेवाडी उटी, भादा ते औसा आणि भादा ते मुरुड या भागातील अशा विविध रस्त्याची मागणी पायी चालत जाऊन तत्कालीन दोन आमदारांना निवेदन देण्यात आले होते.

यामुळे तत्कालीन आमदार आणि प्रशासनातील अधिकारी यांनी तातडीने याची दखल घेऊन या भागातील रस्त्यांना तात्काळ मंजुरी देऊन या कामांना तांत्रिक प्रशासकीय बाबी पूर्तता करून तात्काळ काम सुरू करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार काही कामे पूर्ण झाली परंतु सदरील भागातील शिवली मार्गावरील हा पूल नुकताच सुरू केल्याने सध्या काम प्रगतीपथावर आहे हे काम सुरू करण्यासाठी स्थानिक पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते आणि संबंधित प्रशासनातील अधिकारी यांच्या प्रयत्नामुळे आणि संबंधित शेतकऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्यामुळे हा रस्ता काम सुरू झाले आणि यामुळेच भविष्यातील प्रगतीचा मार्ग सुरू करण्यासाठी सहकार्य केल्याचे समजते.

## शिवजयंती निमित्ताने वागदरी येथे शिव सप्ताहाचे उदघाटन: विविध कार्यक्रमाचे केले आयोजन

**वागदरी । किशोर धुमाळ**

सालाबाद प्रमाणे तुळजापूर तालुक्यातील मौजे वागदरी येथे शिवजयंतीच्या निमित्ताने दि.१३ फेब्रुवारी २०२६ रोजी शिव सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले असून दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान शिव सप्ताह निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी भव्य मिरवणुकीने या सप्ताहाची सांगता करण्यात येणार आहे.

शिव– बसव– राणा व काशीबा महाराज जन्मोत्सव मंडळ वागदरी ता. तुळजापूरच्या वतीने दरवर्षी शिवजयंतीचे औचित्य साधून शिव सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी जन्मोत्सव मंडळाच्या वतीने शिव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर, महाराणा प्रताप व श्री संत काशिबा महाराज यांच्या प्रतिमांची प्रतिष्ठापना करून शिव सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले असून या निमित्ताने दि.१४ फेब्रुवारी रोजी शिवपुजा, दि.१५ फे. रोजी महाशिवरात्री, दि.१६ फे. रोजी शालेय विद्यार्थ्यांची सामान्य ज्ञान स्पर्धा, दि.१७ फेब्रुवारी रोजी सकाळी शिव पुजा व भव्य रक्तदान शिबिर, दि.१८ फेब्रूवारी रोजी महिलांचा सांस्कृतीक कार्यक्रम तर दि.१९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर, महाराणा प्रताप व श्री संत काशिबा महाराज यांच्या प्रतिमांची पालकीतून भव्य मिरवणूक काढून या शिव सप्ताहाची सांगता करण्यात येणार आहे.



तर सामान्य ज्ञान स्पर्धेत प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या स्पर्धकाना अनुक्रमे ११०००, ५०००, २५०० रु रोख रक्कम व प्रत्येक सहभागी स्पर्धकाना स्कूल बॅग व शालेय साहित्य देण्यात येणार आहे, अशी माहिती जन्मोत्सव मंडळाच्या वतीने उद्घाटन प्रसंगी देण्यात आली. या वेळी ॲड.अमोल पाटील, जन्मोत्सव मंडळाचे अध्यक्ष प्रशांत यादव, उपाध्यक्ष रवी यादव, सचिव भगतसिंग ठकूर, मिरवणूक प्रमुख रामसिंग चव्हाण, रमेश पवारसह जेष्ठ नागरिक व युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

## लातूर शहर जिल्हा भाजपाच्या वतीने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांचा निषेध

**लातूर । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना करून त्यांना समकक्ष ठरविण्याचा जो दुर्दैवी आणि महाराष्ट्राच्या अस्मितेवर घाला घालण्याचे जे वक्तव्य केले आहे. ते निंदनिय असून या बद्दल त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून काँग्रेस पक्षाने त्यांची तात्काळ पदावरून हकालपट्टी करावी, अशी मागणी लातूर शहर जिल्हा भाजपाच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केली आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल जे वक्तव्य केले आहे. त्या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी शहरजिल्हा भाजपाच्या वतीने लातूर येथील काँग्रेस भवनसमोर भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले होते. या प्रसंगी हर्षवर्धन सपकाळ यांच्या विरोधात घोषणाबाजी करून त्यांच्या प्रतिमेचे दहन करण्यात आले. यावेळी माजी शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक देविदास काळे, सरचिटणीस संजय गीर, प्रविण कस्तुरे, मनपा गटनेते ॲड. दिपक मठपती आदींची प्रमुख उपस्थिती होती.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना करून हे दोन्ही राजे एकाच कक्षेत आणण्याचे वक्तव्य केले आहे. त्यांचे हे वक्तव्य म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेवर घाला घालण्याचा प्रकार असल्याचे सांगून या माध्यमातून काँग्रेस धर्मा–धर्मात तेढ निर्माण करत असल्याचे अजित पाटील कव्हेकर यांनी स्पष्ट केले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी समान न्याय, स्त्री सन्मान आणि लोककल्याण या भक्कम तत्वावर स्वराज्य निर्माण केले होते. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण जगाची अस्मिता आहे. मात्र सपकाळ यांनी हे वक्तव्य करून काँग्रेसचा खरा चेहरा समोर आणला असल्याचा आरोप अजित पाटील कव्हेकर यांनी केला. टिपू सुलतान यांनी त्यांच्या कारकिर्दीत भारतासह इतर देशांमध्येही धर्मांतराचे अघोरी प्रकार केले असल्याचे या माध्यमातून अनेकांवर अन्याय व अत्याचारही केले असल्याचे अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले.



या आंदोलनात शहर जिल्हा सरचिटणीस तथा नगरसेविका रागिणी यादव, अदिती पाटील कव्हेकर, शोभा पाटील, संगिता मिर्चे, सत्यवती चेवले, राजश्री धोत्रे, ऋषिकेश राजे, अनंत गायकवाड, मंडलाध्यक्ष रोहित पाटील, राहुल भुतडा, सुरेश जाधव, ज्योतिराम चिवडे, पवन आल्टे, अभिजीत मुनाळे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

*धाराशिव *वर्ष १ *अंक १७ जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, घर क्र.२२/२०, एस.टी. कॉलनी, बार्शी नाका, धाराशिव महाराष्ट्र ४१३५०१ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) ई-मेल-jagmirta2010@gmail.bom

PRGI.No.- MHMAR/26/A0224

*Dharashiv, *Year 1, *Issue 17 Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, House No. 22/20, S.T. Colony, Barshi Naka, Dharashiv, Maharashtra 413501. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email: jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0224

cmyk

# ३८ वी राष्ट्रीय अर्थशास्त्र परिषद संपन्न

पैठण, पाचोड/**त्रिसिंग पा जायभाये**

शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाचोड येथे पीएम उषा सॉफ्ट कंपोनंट व अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित ३८ व्या राष्ट्रीय अर्थशास्त्र परिषदेचा सांगता सोहळा उत्साहात व शैक्षणिक वातावरणात पार पडला. देशातील बदलत्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या परिषदेने शाश्वत विकास, औद्योगिक व कृषी



धोरणे, तसेच जागतिक अर्थव्यवस्थेतील बदलांचा भारतावर होणारा परिणाम या विषयांवर सखोल चिंतन घडवून आणले सदर समारोप सोहळ्यास प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. विलास खंदारे, डॉ. दिलीप अर्जुने आणि डॉ. अर्जुन मोरे यांची होती अध्यक्षीय स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी भूषविले. तसेच मराठवाडा अर्थशास्त्र परिषद चे सचिव व कोषाध्यक्ष डॉ. विश्वनाथ कोकर यांची विशेष उपस्थिती **(पान २ वर)**


# सामत परिवार व सामत मित्रमंडळ, परळी वैजनाथ यांच्यावतीने महाशिवरात्री निमीत्त उपवास फराळ वाटप कार्यक्रम संपन्न

परळी वैजनाथ (प्रतिनीधी): परळी वैजनाथ येथे १२ ज्योतींलिंगा पैकी पंचम म्हणजेच पाचव्या क्रमांकाचे ज्योतींलिंग आहे. सदर ज्योतींलिंगाच्या दर्शनासाठी महाशिवरात्री निमीत्ताने महाराष्ट्र राज्य व देशाच्या इतर भागातून लाखो भावीक दर्शनासाठी येत असतात. दि.१५.०२.२०२६ रोजी महाशिवरात्री निमीत्ताने परळी-वे. येथे येणारे भावीक भक्तांच्या सुविधेसाठी परळी-वे. येथील सामत परिवाराच्यावतीने दर वर्षी प्रमाणे याही **(पान २ वर)**



# जिजामाता नॅशनल स्कूल चे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

## चिमुकल्यांचा उत्साह व पालकांचा उदंड प्रतिसाद...!!!




परळी वैजनाथ (प्रतिनिधी) : जिजामाता नॅशनल स्कूल (इयत्ता पहिली ते दहावी) या इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम हनुमान नगर, नांदूर वेस, परळी वै. येथील शाळेच्या प्रांगणात दि. १४ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात व थाटात पार पडला कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून एलआयसी ऑफ इंडिया शाखा-परळीचे ब्रँच मॅनेजर नरसिंह बिरेवाड, स्टेट बँक ऑफ इंडिया - छ. संभाजीनगर चे ब्रँच मॅनेजर मल्हार हाके, गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक कॉलेज-नांदेड येथील प्राध्यापक गजानन हुगे सर, शासकीय डी. एड. कॉलेज - उदगीर येथील प्राध्यापक सचिन बोकन सर, परळीतील नामवंत पैलवान नारायण देव गोपनपाळे इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती.

सर्व मान्यवरांचे स्वागत संस्थेतर्फे संस्थेचे अध्यक्ष डी.पी.जायभाये यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवनाथ बदने हे उपस्थित होते. उपस्थित विद्यार्थ्यांना सर्व मान्यवरांनी अतिशय उपयुक्त असे मार्गदर्शन केले.

सोबत विविध स्पर्धांमध्ये सहभागी व यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्हासह मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी १४ फेब्रुवारी २०१९ रोजी पुलवामा येथील हल्ल्यात शहीद झालेल्या सैनिकांना श्रद्धापूर्वक अभिवादन केले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी व लहानग्या चिमुकल्यांनी केलेल्या नृत्याचे सर्व मान्यवरांनी तोंड भरून कौतुक केले. कार्यक्रमास पालकांची उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी संस्थेच्या सचिव श्रीमती कविता जायभाये, संस्थेचे पदाधिकारी दामोदर विटेकर, अमोल बदने आणि शाळेच्या प्राचार्या श्रीमती नयना गिरी तसेच शाळेच्या सर्व शिक्षक वृंदांनी खूप मेहनत घेतली. अतिशय आनंदी वातावरणात हा सोहळा पार पडला.

# अवैध गुटखा विक्री

## पोलीस अधीक्षकांकडे तात्काळ कारवाईची मागणी

माजलगाव (प्रतिनिधी) : शहरात शासनाने बंदी घातलेल्या गुटख्याची अवैध विक्री सुरू असल्याचा आरोप करण्यात आला असून, संबंधित व्यक्तीवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात मा. पोलीस अधीक्षक, बीड जिल्हा यांना निवेदन देण्यात आले आहे.निवेदनानुसार, ऋषिकेश रत्नाकर मिसाळ हे दुकान व गोडाऊनमध्ये गुप्त साठा ठेवून खुलेआम गुटखा विक्री करत असल्याचे निदर्शनास आले आहे. यापूर्वीही त्याच्यावर गुटखा विक्री प्रकरणी कारवाई करण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही अवैध व्यवसाय सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सदर प्रकरणात २००३ च्या कलम २४, २६ व २७ तसेच भा.दं.वि. कलम २७२ व २७३ अंतर्गत कठोर कारवाई करून अवैध साठा जप्त करावा आणि भविष्यात अशा प्रकारच्या विक्रीस आळा घालण्यासाठी नियमित तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.हे निवेदन बाळासाहेब आडागळे, परमेश्वर सोळंके, अरविंद ओव्हाळ, विष्णू उगले यांच्यासह माजलगाव पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्यांनी दिले आहे.

# प्रकाश दादा कवठेकर यांच्या हस्ते दहा लाखांच्या रस्ता कामाचे भूमिपूजन

बीड (प्रतिनिधी) : उखंडा ता. पाटोदा येथील ग्रामस्थांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या दहा लाख रुपयांच्या रस्ता कामाचे भूमिपूजन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. आमदार निधीतून मंजूर करण्यात आलेल्या या कामाचा शुभारंभ लोकनेते मराठवाडा भूषण तथा आष्टी-पाटोदा-शिरूरचे लोकप्रिय आमदार मा. सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ॲड. प्रकाश (दादा) कवठेकर यांच्या हस्ते करण्यात आला.

गेल्या अनेक वर्षांपासून उखंडा गावातील नागरिकांना रस्त्याच्या समस्येला सामोरे जावे लागत होते. पावसाळ्यात चिखल व खड्ड्यांमुळे



वाहनचालकांसह शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. ग्रामस्थांनी वेळोवेळी ही समस्या लोकप्रतिनिधींसमोर मांडली होती. या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी तात्काळ दखल घेत आमदार निधीतून दहा लाख रुपयांची तरतूद करून रस्ता कामाला मंजुरी दिली.

भूमिपूजन प्रसंगी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर गावातील दळणवळण व्यवस्था अधिक सुलभ होईल. शेतमाल वाहतूक, शाळा-कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांची ये-जा आणि आपत्कालीन सेवांसाठीही हा रस्ता अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी अशा मूलभूत सुविधा अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.



प्रसिद्ध मधुमेहतज्ञ डॉ.अतुल शिंदे यांना डायबेटिज इंडिया या राष्ट्रीय संस्थेचा डायबेटिज अवेअरनेस इनिशिएटिव्ह अवॉर्ड २०२६ जाहीर झाला आहे. गेल्या १३ वर्षांपासून योगेश्वरी डायबेटिज केअर सेंटरच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची ही राष्ट्रीय दखल आहेत. त्या बदल त्याचा शाल श्रीफळ गुच्छ देवून सत्कार करताना माजी नगरसेवक महादेव इटके डॉ.प्रदीप वांगीकर उपस्थित होते.

# भोसरी तळेगाव सह बंजारा सेवा संघ वतीने संत सेवालाल जयंती उत्साहात साजरी

पिंपरी चिंचवड (बद्रीनारायण घुगे) : भोसरी लांडेवाडी तुळजा भवानी मंदिर पासून ते गबाजी उद्यान दिघी पर्यंत लाखोच्या संख्येने पिंपरी चिंचवड व परिसरातील बंजारा समाजातील पुरुष व महिला मोठा जनसमुदाय लोटला होता संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीत सहभागी आळंदी भोसरी मोशी जाधववाडी चिखली तळवडे काळेवाडी हिंजवडी निगडी या परिसरातील बंजारा समाजातील सर्व स्तरातील उपस्थित ढोल ताशांच्या गजरात वाजत गाजत डिजे आवाजात धार्मिक भजन करत शहरातून मिरवणूक काढण्यात आली शांततेत तसेच कर्नाटक विदर्भ मराठवाड्यासह बंजारा समाजातील पुणे पिंपरी चिंचवड शहरात वास्तव्यास आहेत त्यामुळे सालाबादप्रमाणे यंदाही सेवालाल महाराज जयंती साजरा करण्यात **(पान २ वर)**



# चऱ्होलीचे ग्रामदैवत श्री वाघेश्वर महाराज श्री शिवमहापुराण कथा सोहळा महाशिवरात्री सोहळा उत्साहात

पिंपरी चिंचवड (बद्रीनारायण घुगे) : सालाबादप्रमाणे महाशिवरात्री दिनानिमित्त श्री शिवमहापुराण कथा सोहळा व ५१ कुंडी रुद्रयाग तसेच अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असुन ७ ते १४ फेब्रुवारीपर्यंतच्या या सोहळ्यात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले दैनंदिन धार्मिक कार्यक्रमात सकाळी पाच ते साडेसहा काकड आरती, सकाळी सात वाजता अश्वारूढ छत्रपती महाराज पूजन, सकाळी साडेआठ ते साडेदहा शिवलीलामृत ग्रंथ पारायण, दुपारी साडेअकरा ते चार महिला भजन, सायंकाळी सव्वा पाच ते सहा महाआरती, सायंकाळी सहा ते रात्री नऊ श्री शिवमहापुराण कथा सोहळा, रात्री नऊ ते दहा महाप्रसाद आणि रात्री १० नंतर हरिजागर (पुरुषांचे भजन) होणार आहे. शिवपुराण सुप्रसिद्ध कथाकार हभप मनमोहन महाराज गिरी यांचे सुखाव्य श्री शिवमहापुराण कथा




सादर करणार आहेत. रोज सकाळी ८.३० ते ११ वाजता १००८ महिलांच्या वतीने श्री शिवलीलामृत ग्रंथाचे पारायण सोहळा होणार आहे. सोमवारी ९ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसात वाजता रुद्राभिषेक होणार आहे. गुरुवारी १२ फेब्रुवारी रोजी ५१ कुंडी रुद्रयाग यज्ञ व सकाळी नऊ ते बारा आहुतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या माध्यमातून १०८ विवाहित दांपत्यांना पूजेचा मान देण्यात आला आहे. १४ फेब्रुवारीला हभप मनमोहन महाराज गिरी यांचे काल्याचे कीर्तन सकाळी दहा ते बारा या वेळात झाले दि १५ रोजी महाशिवरात्री दिवशी भाविकांची मोठी गर्दी झाली दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना प्रसाद म्हणून पोटभर उपवास साबुदाणा खिचडी शाबूदाण वडा फराळी चिवडा केळी चहा ताक दुध राजगिरा लाडू उपवास पदार्थ भाविकांना वाटप करण्यात आले तसेच भोसरी विधानसभा आमदार महेशदादा लांडगे, माजी महापौर नगरसेवक नितीन आप्पा काळजे, नगरसेवक सचिन तापकीर, यांची उपस्थिती होती तसेच चहोलीचे ग्रामदैवत श्री वाघेश्वर **(पान २ वर)**

# शेख बिलाल व वकील यांच्या पाठपुराव्याला यश; गरिबांसाठी भव्य शादीखाना उभारणार

बीड (प्रतिनिधी) : बीड शहराच्या ऐतिहासिक वैभवाचा साक्ष असलेल्या डाक बंगला इमारतीला आता पुन्हा एकदा ऊर्जितावस्था प्राप्त होणार आहे. वॉर्ड क्र.१७ चे नगरसेवक शेख बिलाल आणि वकील सर यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस व माजी मंत्री अमरसिंह पंडित यांनी या इमारतीच्या नूतनीकरणासाठी मंजुरी जाहीर केली आहे. याठिकाणी सर्वसामान्यांसाठी माफक दरात अत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त शादीखाना (लग्नघर) उभारण्यात येणार आहे. आसफ जाही सल्तनत काळातील हा डाक बंगला एकेकाळी ऐतिहासिक सभा, मुशायरे आणि शैक्षणिक चळवळींचे केंद्र होता. मात्र, गेल्या काही काळापासून ही इमारत दुरवस्थेत होती. फलकनुमा चौक येथे आयोजित सल्लागार बैठकीत बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, ''डाक बंगल्याचे नूतनीकरण करून त्याला भव्य स्वरूप दिले जाईल. येथे चोवीस तास वीज उपलब्ध राहण्यासाठी आधुनिक सोलर पॅनेल बसवले जातील. हे लग्नघर विशेषतः गरीब व





गरजू जनतेसाठी अत्यंत रास्त दरात उपलब्ध करून दिले जाईल.लोकप्रतिनिधी आणि मान्यवरांची उपस्थिती नगरसेवक शेख बिलाल यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच या इमारतीच्या नूतनीकरणाची आणि त्याचे लग्नघरात रूपांतर करण्याची आग्रही मागणी केली होती. या मागणीला उपस्थित सर्व नगरसेवक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिला.या कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर अमरसिंह पंडित (माजी मंत्री व सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस)शेख बिलाल (नगरसेवक, वॉर्ड क्र. १७) सय्यद मोईनुद्दीन मास्टर व सय्यद सादिक अली (ज्येष्ठ नगरसेवक) फारुख **(पान २ वर)**

# धुनकवाड येथे धुनकेश्वर मंदिरात महाशिवरात्र उत्साहात साजरी

## हजारो भाविक-भक्तांनी घेतला दर्शनाचा लाभ

धारूर (अतूल शिनगारे) धारूर तालुक्यातील धुनकवाड येथील ग्रामदैवत असलेल्या धुनकेश्वर मंदिर येथे महाशिवरात्रीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून महाशिवरात्र मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. डोंगरपट्ट्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या मंदिरात हजारो भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला.



महाशिवरात्रीनिमित्त ग्रामस्थांनी प्रत्येक घरासमोर सडा-सारवण करून आकर्षक रांगोळ्या काढत धुनकेश्वराच्या पालखीचे स्वागत केले. गावातून टाळ-मृदंगाच्या गजरात आणि 'हर हर महादेव'च्या जयघोषात भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. संपूर्ण धुनकवाड नगरी भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाली होती. पालखीचे विधिवत पूजन करून भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदविला. दिवसभर भाविकांकडून **(पान २ वर)**

# श्रीक्षेत्र देहूगाव व परिसरात महाशिवरात्री उत्साहात साजरी

## हर हर महादेव च्या गजराने शिवभक्तमय वातावरण

देहूगाव (प्रतिनिधी) : श्रीक्षेत्र देहूगाव येथील सिद्धेश्वर ते येलवाडी येथील येलेश्वर या ऐतिहासिक मंदिरात , महाशिवरात्री निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून महाशिवरात्री उत्साहात साजरी करण्यात आली.पहाटे पासून मोठ्या प्रमाणात शिवभक्तांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या, हर हर महादेव ,ओंम नमो शिवाय ,या नामोचाराने श्री महादेवाच्या पिंडीवर, दही, दूध, मध अशा पंचामृताचा अभिषक घालून, धूप दीप लावून आणि शेवटी बेलाचे पण वाहून ,शिवभक्तांनी तासनतास रांगेत उभे राहून दर्शन घेतले. त्यामुळे सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. देहूगाव ,येलवाडी, चिंचोली येथील श्री महादेव मंदिरात पहाटे महाभिषक, महापूजा, होम हवन, **(पान २ वर)**






श्री श्री ज्ञानमंदिर येथे परळी नगरपरिषदेच्या नगरसेवक पदी आर्ट ऑफ लिव्हिंग च्या साधिका सौ जयश्री शंकरअप्पा मोगरकर या निवडून आल्याबद्दल आज महाशिवरात्री च्या निमित्ताने आयोजित महासुदर्शनक्रिया कार्यक्रमात शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी आर्ट ऑफ लिव्हिंग चे टिचर श्रीनिवास पत्की, श्री श्री ध्यान क्षेत्राचे खजिनदार संजय सेवलकर, डीडीसी मेम्बर व माजी नगरसेवक महादेव ईटके, माजी नगरसेविका वर्षाताई पिंपळे, राहुल सामत, योगा शिक्षक शंकर केंद्रे, तलाठी रमाकांत गुजर, मुकेश काबरा, राहुल निर्मळे, सोमेश्वर ब्याळे, महादेव गिरी, रुस्तुम लोखंडे, उत्तम बोडखे, सचिन स्वामी, पवन साळुंखे, संतोष राका, ज्ञानेश्वर सुरवसे, संभाजी पवार, रोहित बनसोडे, लक्ष्मीबाई रेडे, छायाताई स्वामी, भाग्यश्री केंद्रे, सुरेश लोढा आदी उपस्थित होते.

# पीएमसी जि.प.केंद्रीय प्राथमिक कन्या शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न

धारूर (अतूल शिनगारे) : वडवणी येथील पीएमसी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक कन्या विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहपूर्ण वातावरणात व विविध ऐतिहासिक-धार्मिक स्थळांना भेटी देत यशस्वीरीत्या संपन्न झाली. या सहलीदरम्यान विद्यार्थिनींनी मनमुराद आनंद लुटत विविध स्थळांची माहिती प्रत्यक्ष पाहणीद्वारे जाणून घेतली.



शाळेच्या वतीने बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक, धार्मिक व पर्यटनस्थळांना भेट देण्यासाठी ही शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली होती. या सहलीत प्रथम परळी येथील गोपीनाथ गडावर भेट देण्यात आली. येथे विद्यार्थिनींनी स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेतले तसेच गडाची सविस्तर पाहणी करून त्याचा इतिहास जाणून घेतला. त्यानंतर परळी येथील श्री वैद्यनाथ मंदिरातील ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्यात आले.यानंतर परळी येथे राज्य पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय महापशुधन एक्स्पो मेळाव्यास भेट देण्यात आली. या ठिकाणी असलेल्या विविध स्टॉलची पाहणी करून विद्यार्थिनींना पशुसंवर्धन व कृषीविषयक माहिती देण्यात आली.त्यानंतर विद्यार्थिनींनी अंबाजोगाई येथील योगेश्वरी मंदिर, हत्तीखाना व आद्यकवी मुकुंदराज समाधीस्थळास भेट दिली. पुढे धारूर येथील ऐतिहासिक किल्ल्याची पाहणी करून किल्ल्याचा इतिहास व महत्त्व विद्यार्थिनींना **(पान २ वर)**

**बीड * वर्ष १६ वे * अंक १०७ * जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक कृष्णा बालासाहेब कडबाने**

**RNI.No.MAHMAR/2011/38814 LSB/Beed/RNP-2025-2027**

Beed * Year 16 * Issue 107 * The Jagmitra newspaper is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed (Maharashtra) and published at the Daily Jagmitra office, 'Jagmitra', Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, District Beed (Maharashtra). (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. * As per the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Executive Editor: Krushna Balasaheb Kadbane

**RNI.No.MAHMAR/2011/38814 LSB/Beed/RNP-2025-2027**